दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

* संपादक : काकासाहेब नवले * RNI No. MAHMAR/2019/82605 * वर्ष ७ वे * पाने ८ * मुल्य रू. ४.०० * अंक ११६
* बुधवार ४ फेब्रुवारी २०२६ * पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282

## अजितदादांचा दशक्रिया विधी होणार नाही



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतरच्या धार्मिक विधींबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. अजित पवार यांचा 'दशक्रिया विधी' होणार नाही, असं त्यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी स्पष्ट केलं आहे. अस्थि विसर्जनाच्या दिवशीच सर्व धार्मिक विधी पार पाडण्यात आले असल्याने, आता यापुढे कोणताही वेगळा विधी केला जाणार नसल्याचं कुटुंबियांकडून सांगण्यात आलं आहे. ६ फेब्रुवारी रोजी त्यांचा दहावा दिवस (दशक्रिया विधी) होता. मात्र, श्रीनिवास पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, कुटुंबियांनी अस्थि विसर्जनाच्या वेळीच आवश्यक ते सर्व विधी पूर्ण केले आहेत. त्यामुळे आता १० व्या किंवा १३ व्या दिवसाचा कोणताही सार्वजनिक किंवा धार्मिक विधी आयोजित केला जाणार नाही.

# कर्जमाफी गरीब शेतकऱ्यांसाठी



## धन दांडग्या, 'फार्म हाऊस'वाल्यांना लाभ मिळणार नाही : बावनकुळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर धाराशिव : गरीब शेतकऱ्यांची सरकारकडून कर्जमाफी केली जाणार आहे. शेतकरी कर्जमाफीचा दिलेला शब्द सरकार नक्की पाळेल, असा ठाम विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. फार्महाऊसधारक किंवा धनदांडग्या शेतकऱ्यांचा विचार न करता, वर्षानुवर्षे शेतात राबणाऱ्या गरीब शेतकऱ्यांसाठीच कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. कर्जावर व्याज आणि व्याजावर व्याज वाढत असल्यामुळे शेतकरी आत्महत्येचा विचार करतो, मात्र अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही. गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकार करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.



धाराशिव जिल्ह्यातील येणेगुर येथे जिल्हा परिषद निवडणुकीसाठीच्या प्रचार सभेत बावनकुळे बोलत होते. पुढील काळात शेतकऱ्यांना कर्ज घ्यावं लागू नये, असा विचारही सरकार करत आहे.

गरीब शेतकरी ४० - ४० वर्षे शेतात राबतात. कर्जबाजारी होऊन आत्महत्येचा विचार करतात. या शेतकऱ्यांना आम्ही आत्महत्या करू देणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या या वक्तव्यामुळे महायुती सरकारकडून लवकरच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता राज्य सरकार कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा कधी करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र, बावनकुळे यांनी फक्त गरीब शेतकऱ्यांनाच कर्जमाफी मिळेल, असे म्हटले आहे. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांच्या निकषात नेमके कोणते शेतकरी बसणार आणि कोणत्या शेतकऱ्यांना वगळले जाणार, शेतकऱ्यांची गरिबी ठरवण्याचा मापदंड काय असणार, हे प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

केंद्र सरकारने एक कोटी लखपती दीदी योजना सुरू केल्याचं सांगत, आता राज्यातील महिलांना विनातारण, विनाहमी पाच लाख रुपयांचं बिनव्याजी कर्ज मिळणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. धाराशिव जिल्ह्यातील येणेगुर येथील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने आयोजित सभेत बावनकुळे बोलत होते.

■ **काँग्रेसचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये लाडकी बहीण योजना बंद करण्यात आली असल्याचा आरोप महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. देशातील भाजपशासित राज्यांमध्ये मात्र ही योजना सुरू असून, महाराष्ट्रातही नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लाडकी बहीण योजना सुरूच राहील, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.**

## लोकसभा सभापतींवर कागदाचे तुकडे भिरकावले

### राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान गोंधळ; आठ खासदार निलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** लोकसभेत खासदार राहुल गांधी यांच्या भाषणावेळी प्रचंड गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरळीत होण्यास सुरुवात झाली. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चे दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, तसेच, हा चीन आणि पाकिस्तानशी संबंधित राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा आहे असे त्यांचे विधान पुन्हा मांडले. त्यांना बोलण्यापासून थांबवण्यात आल्यानंतर विरोधी खासदारांनी गदारोळ केला व फाडलेली कागदे सभापतींच्या दिशेने भिरकावली. त्यामुळे गदारोळ करणाऱ्या आठ खासदारांना निलंबित करण्यात आले आहे.

राहुल गांधी यांनी मांडलेल्या विषयावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. विरोधी पक्षनेते सभागृहाच्या दिशा चुकवत आहेत, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षांच्या बैठकीत झालेल्या चर्चेचा संदर्भ देत आम्ही येथे एकतेसाठी आहोत, परंतु त्यांनी (पान ४ वर)



**निलंबनाची कारवाई झालेले खासदार**

**या अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित केलेल्या खासदारांमध्ये माणिकम टागोर, किरण कुमार रेड्डी, प्रशांत पडोले, हिबी एडन, डीन कुरिया कोसे, एस. वेंकटेशन, गुरजीत सिंग औजला आणि अमरेंद्र सिंग राजा वारिंग यांचा समावेश आहे. या अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी एकूण आठ विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले आहे.**

## महत्त्वाचे..



### नाशिकच्या महापौर पदासाठी भाजपकडून हिमगौरी आडके

**नाशिक :** शेवटपर्यंत सस्पेन्स ठेवलेल्या भाजपाने नाशिक महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी हिमगौरी आडके यांना उमेदवारी जाहीर केली, तर उपमहापौरपदासाठी मच्छिंद्र सानप यांचा अर्ज दाखल करण्यात आला. या निवडणुकीत भाजपची मजबूत स्थिती असल्याने त्यांचे उमेदवार विजयी होण्याची शक्यता प्रबळ आहे, परंतु विरोधी पक्षांकडूनही जोरदार आव्हान उभे राहिले आहे.

नाशिक महापालिकेत भाजपने ७२ नगरसेवक निवडून आणून बहुमत मिळवले आहे. त्यामुळे महापौर आणि उपमहापौर ही दोन्ही पदे त्यांच्या ताब्यात येणे निश्चित मानले जात आहे. पक्षाने उमेदवारांच्या निवडीसाठी चार नावांची यादी प्रदेश पातळीवर पाठवली होती. या प्रक्रियेनंतर आडके आणि सानप यांची नावे अंतिम करण्यात आली. पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की, या निवडीमुळे शहराच्या विकासाला नवीन दिशा मिळेल. हिमगौरी आडके या अनुभवी नगरसेविका आहेत. त्याचप्रमाणे मच्छिंद्र सानप शहरातील स्थानिक मुद्द्यांवर सक्रिय राहिले आहेत.

## 'एमसीए'मध्ये पवार कुटुंबातील ४०० आजीवन सदस्य नोंदवले!

### आ. रोहित पवार यांच्यावर सर्वोच्च न्यायालय संतापले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** 'इतकी बेकायदेशीर कामे करण्याची हिंमत कशी होते', असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवारांना विचारला आहे. रोहित पवारांनी पवार कुटुंबातील सदस्यांसह ४०० आजीवन सदस्य नोंदवले होते. त्याविरोधात टीम इंडियाचा माजी क्रिकेटर केदार जाधव याने याचिका दाखल केली होती. त्यावरुन सुप्रीम कोर्टाने रोहित पवारांना सवाल विचारले.



'बेकायदेशीर कामे करता, केस मागे घेता की डिसमिस करु?' अशी विचारणा करत महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सदस्य नोंदणीवर कोर्टाने तीव्र आक्षेप घेतला. रोहित पवारांनी पवार कुटुंबातील सदस्यांसह ४०० आजीवन सदस्य नोंदवले होते. बीसीसीआय प्रकरणी निकाल दिल्यानंतर सदस्य नोंदणीला सुप्रीम कोर्टाची परवानगी लागते. आधी एमसीएच्या संविधानात तसा बदल करावा लागतो, याची माहिती असूनही बेकायदेशीर काम केल्याचा ठपका रोहित पवारांवर आहे. याच प्रकरणात सुप्रीम कोर्टाने रोहित पवारांना खडे सवाल विचारले.

केदार जाधव यांच्या याचिकेनंतर हायकोर्टाने अंतरिम स्थगिती दिली होती. त्याविरोधात रोहित पवार सुप्रीम कोर्टात गेले होते. यावर सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. इतकी बेकायदेशीर कामे करण्याची हिंमत कशी होते, असा सवाल सुप्रीम कोर्टाने केला. सुप्रीम कोर्टाच्या इशाऱ्यानंतर अखेर रोहित पवारांनी याचिका मागे घेतली.

रोहित पवारांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनची सत्ता टिकवण्यासाठी मनमानी पद्धतीने संघटनेची सदस्यसंख्या वाढवल्याचा आरोप भारताचा माजी क्रिकेटपटू केदार जाधवने केला होता . केदार जाधव हा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचा सदस्य असून भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी देखील आहे . रोहित पवारांनी आपल्या बाजूने मतदान व्हावं यासाठी एम सी ए ची सदस्यसंख्या १५४ वरुन वाढवून ५७१ नेली. त्यासाठी रोहित पवारांनी सदस्य करून घेतलेल्यांमधे त्यांची पत्नी कुंती , सासरे सतिश मगर यांच्यासह सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सदानंद सुळे यांचाही सामावेश आहे. त्याचबरोबर रोहित पवारांच्या कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी देखील सदस्य (पान ४ वर)

# शालार्थ घोटाळ्यात आता संस्थाचालकांचा नंबर

## बनावट नियुक्त्या देणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** राज्यभरात गाजत असलेल्या शालेय शिक्षण विभागातील शालार्थ घोटाळ्यात आतापर्यंत अनेक अधिकाऱ्यांना अटक झाली. मात्र, संबंधित शिक्षक, कर्मचाऱ्यांना नियुक्त्या देत बनावट कागदपत्रे सादर करणारे खासगी शिक्षण संस्थाचालक मोकाटच होते. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाने कर्मचाऱ्यांच्या मूळ नियुक्तीत अनियमितता असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित व्यवस्थापनाच्या (संस्थाचालक) विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देशच शासन निर्णयाद्वारे दिले आहेत.

शालेय शिक्षण विभागात शालार्थ घोटाळा गाजत आहे. या घोटाळ्यात शिक्षण विभागातील अनेक अधिकाऱ्यांना अटक झाली आहे. घोटाळ्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रात असल्यामुळे २०१२ पासून दिलेल्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडीची विशेष तपास पथकाच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे. त्यात दोषी आढळल्यानंतर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई होत आहे. मात्र, ज्या संस्थाचालकांनी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही होत नसल्याकडे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी लक्ष वेधले होते. ६ फेब्रुवारी २०१२ च्या शासन निर्णयानुसार खासगी 'व्यवस्थापन' हेच कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी आहे. पारदर्शक पद्धतीने भरती प्रक्रिया राबविणे ही त्यांची जबाबदारी आहे. २३ ऑगस्ट २०१७ व १० जून २०२२ रोजी वैयक्तिक मान्यता व शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट (पान ४ वर)

**संस्थेचा ठराव, नियुक्ती आदेश**

**प्रत्यक्ष रुजू झाल्याचा अहवाल तपासणार**

**शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यताची तपासणी करताना ६ फेब्रुवारी २०१२ व १० जून २०२२ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार कर्मचारी नियुक्ती संदर्भातील संस्थेचा ठराव, नियुक्ती आदेश, प्रत्यक्ष रुजू झाल्याचा अहवाल तपासावा, कर्मचाऱ्याच्या शाळेचा प्रत्यक्ष हजेरी पट आणि संस्थेचे कार्यालयाच्या 'आवक-जावक' नोंदवहीची तपासणी करावी. त्यात कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ प्रणालीत अनियमितता आढळल्यास व्यवस्थापनातील व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता व इतर कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेशही ३० जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयात दिले आहेत.**

## नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर महामार्गास मंजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगरच्या विकासाला नवी दिशा देणारा महामार्ग**

**अहिल्यानगर :** केंद्रीय मंत्रिमंडळाने नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर-अक्कलकोट या ६ पदरी, प्रवेश-नियंत्रित (ॲक्सेस कंट्रोल्ड) ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पास मंजुरी दिली असून, हा निर्णय अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्याचा समावेश राष्ट्रीय दर्जाच्या द्रुतगती महामार्ग जाळ्यात होणार असून, दळणवळणाच्या दृष्टीने अहिल्यानगरला नवे महत्त्व प्राप्त होणार असल्याची माहिती खासदार निलेश लंके यांनी दिली.

या महामार्गाची एकूण लांबी सुमारे ३७४ किलोमीटर असून, सुमारे १९ हजार १४२ कोटींची गुंतवणूक या प्रकल्पासाठी करण्यात येणार आहे. (पान ४ वर)

## लाडकी बहिण योजनेला अजित पवारांचे नाव द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राष्ट्रवादीचे आ. अमोल मिटकरींची मागणी**

**पुणे :** महाराष्ट्र सरकारची महत्वाकांक्षी योजना असलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजने'ला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांचे नाव देण्याची मागणी राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरींनी केली. अजितदादांच्या दुरदृष्टीतून आलेल्या या योजनेला 'अजितदादांची लाडकी बहिण योजना' असं नाव देत त्यांच्या स्मृती सरकारने वेगळ्या पद्धतीने जपाव्यात, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांना केलीये. अजितदादांना ही सरकार आणि राज्यभरातील लाडक्या (पान ४ वर)

# शाळेच्या सेक्रेटरीकडे मांगितली २० लाखाची खंडणी

## ■ महिलेविरुद्ध श्रीरामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शाळेच्या सक्रेटरीकडे २० लाख रुपये खंडणीची मागणी केल्याप्रकरणी एका महिलेविरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राकेश अनिल न्याती यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, न्याती समता इंटरनॅशनल स्कुल, शैक्षणिक संस्था येथे दिवंगत प्रल्हाद राधाकिसन फुलपगार हे मागील ३ वर्षापासून गार्डन कामकाजासाठी होते. प्रल्हाद फुलपगार हे आजारी असल्याने त्यांनी दि. ३१ जुलै २०२५ पासून सदर काम सोडुन दिले. तेव्हा त्यांची पत्नी सुरेखा प्रल्हाद फुलपगार या वेळोवेळी शाळेवर येऊन, तुमच्यामुळे माझे पती आजारी पडले आहेत.

त्यामुळे मला पैसे द्या, नाहीतर तुमची बदनामी करुन ॲट्रोसिटीचा गुन्हा करण्याची धमकी देत होत्या. तेव्हा बदनामीला घाबरुन दि. २३ सप्टेबर २०२५ रोजी सुरेखा फुलपगार यांना त्यांच्या पतीच्या तुळजाई नागरी पतसंस्था, श्रीरामपूर येथील खात्यात ५० हजार रुपयाची रक्कम एनएफटी व्दारे दिली. त्यानंतर प्रल्हाद फुलपगार हे नोव्हेबर २०२५ मध्ये मयत झाले. प्रल्हाद फुलपगार हे मयत झाल्यानंतर त्यांची पत्नी सुरेखा फुलपगार या दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी उक्कलगाव परिसरातील शाळेवर आल्या व तेथे हेमंत एस. व सुब्रम्हण्यम तसेच इतर कर्मचाऱ्यांशी त्यांनी वाद घातला, तेव्हा शाळेच्या समोरच राहत असलेले अन्सार शेख यांनी मला फोन करून सदर प्रकाराबाबत कळविले, तेव्हा मी तत्काळ शाळेवर गेलो, त्याठिकाणी गेल्यानंतर श्रीमती फुलपगार यांनी माझ्याकडे २० लाख रुपये खंडणीची मागणी केली. सदर रक्कम दिली नाही, तर ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

याप्रकरणी राकेश न्याती यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार सुरेखा फुलपगार हिच्याविरुध्द बीएनएस चे कलम ३०८ (२), ३०८ (३) प्रमाणे खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

### जातीवाचक शिवीगाळ केल्याचा राकेश न्यातीसह ४ जणांविरुद्ध गुन्हा

**पती मयत असतानाही, त्यांच्या नावावर हजेरी रजिस्टरवर खोट्या सह्या करुन, परस्पर पगार काढल्याबाबत विचारणा केली असता, महिलेसह तिची आई व मुलाला जातीवाचक शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी राकेश न्यातीसह चार जणांविरुध्द ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्कलगाव येथील सुरेखा प्रल्हाद फुलपगार (वय ४३) यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून सुरेखा प्रल्हाद फुलपगार (वय ४३) यांच्या फिर्यादीवरुन राकेश न्याती, हेमंत, सुब्रह्मण्यम (पूर्ण नाव माहीत नाही), राजश्री आदित्या काळे (रा. श्रीरामपूर) या चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर हे करत आहेत.**

### झापुक । zupuk

**ज्यांचा आम्ही
आदर्श घ्यायचा
ते बोगस वागतात
सर्वोच्च ठिकाणी
लहान मुलांसारखे
भांडतात**

नवनाथ कुताळ
९४२२२३१८२५

# संपादकीय

## भारताचे भविष्य आशादायी

केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सेन्सेक्स १५४६ अंशांनी घसरून, गुंतवणूकदारांना ११ लाख कोटी रुपयांचा फटका बसला असला, तरी दुसर्या दिवशी सोमवारी बाजार पुन्हा सावरला. अर्थसंकल्पात फ्युचर्स अँड ऑप्शन्स करार व्यवहारांवरील समभाग उलाढाल कर, म्हणजेच एसटीटी वाढवला आहे. एसटीटी हा प्रत्यक्षात इतर करांपेक्षा वेगळा आहे. जितक्या अधिक मूल्याच्या समभागांची खरेदी-विक्री केली जाते, तितकाच अधिक एसटीटी लागतो. त्या व्यवहारातून व्यक्तीला नफा झाला की नाही, या गोष्टीचा करावर काहीही परिणाम होत नाही. महसूल वाढवण्यासाठी आणि बाजारात स्थिरता आणण्यासाठी समभागांच्या व्यवहारांवर हा कर लावला जातो. भारताचे राष्ट्रीय ठोकळ उत्पादन मूल्य, म्हणजेच जीडीपी सुमारे ३०० लाख कोटी रुपये इतके आहे. तर फ्युचर्स अँड ऑप्शन्सची उलाढाल फक्त दीड लाख कोटी रुपये आहे.

या वायदेबाजारातील पूर्णपणे काल्पनिक (नोशनल) व्यवहारांना आळा घालण्यासाठी हा उपाय योजला आहे. तसेच यापुढे समभाग बायबॅकच्या (पुनर्खरेदी) रकमेला 'भांडवली नफा' म्हणून गृहीत धरून, सर्वच भागधारकांना करकक्षेत आणण्याचे प्रस्तावित केले आहे. याआधी समभाग पुनर्खरेदीवर मिळणारी रक्कम 'लाभांश उत्पन्न' ठरत होती. येत्या १ एप्रिल २०२६ पासून ती 'भांडवली नफा' या शीर्षकाखाली करपात्र असणार आहे. शिवाय बायबॅक योजना आणणार्या प्रवर्तकांवर कर लावला आहे. यामुळे परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांच्या सहभागावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे. वास्तविक समभागाच्या पुनर्खरेदीवरील कराचे सुलभीकरण करण्यासाठी बायबॅक संबंधीचा प्रस्ताव आणला आहे, हे ध्यानात ठेवायला हवे. मुळात शेअर बाजारात अर्थसंकल्पाच्या दिवशी ज्या प्रतिक्रिया उमटतात, त्या अनेकदा घाईघाईच्या असतात.

२०१४ पासून नरेंद्र मोदी सरकारने १५वा केंद्रीय अर्थसंकल्प मांडला असून, त्यापैकी आठवेळा सेन्सेक्स कोसळला होता; मात्र यावेळची घसरण ही गेल्या सहा वर्षांतील सर्वाधिक आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीत रविवारी २ टक्क्यांनी घसरण झाली. वायदेबाजारातील व्यवहारांवर वाढवलेल्या एसटीटीमुळे शेअर दलाल खंतावले. वास्तविक वायदेबाजारातील वारेमाप सट्टेबाजीस लगाम घालण्याची गरज होतीच. परंतु, या अर्थसंकल्पात भांडवली बाजारातील तरलता वाढवण्याकरिता परदेशस्थ भारतीयांना देशांतर्गत भांडवली बाजारात गुंतवणुकीची मुभा दिली. एकूण परदेश होल्डिंगची मर्यादा २४ टक्क्यांपर्यंत वाढवली. त्यांच्यासाठी मालमत्ताविक्रीवरील टीडीएसचे नियम सुलभ केले. अर्थात, या सगळ्या सकारात्मक उपायांमुळे भारतात येणारा परदेशी भांडवलाचा ओघ किती वाढतो, ते पाहावे लागेल. कारण, याखेरीज भारतीय उद्योगांची एकूण कामगिरी, त्यांची उलाढाल आणि त्यांचा निव्वळ नफा या सर्व बाबींचा विचार करूनच परदेशी गुंतवणूकदार आपले निर्णय घेत असतात. २०२५ या वर्षात परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातील गुंतवणूक लक्षणीयरीत्या कमी करत नेली आहे. त्यामुळे त्यांना आकर्षित करण्याच्या हेतूने ब-ोकरेजवरील १८ टक्के जीएसटी काढून टाकला, हे बाजारासाठी अत्यंत अनुकूल ठरेल.

परदेशस्थ भारतीयांना पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंट योजनांतर्गत थेट भारतीय समभागांमध्ये गुंतवणूक करता येईल. भारताबाहेरील व्यक्तींना पोर्टफोलिओ गुंतवणूक योजनेडरा सूचीबद्ध भारतीय कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक व्यक्तीसाठी असलेली गुंतवणूक मर्यादा ५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. अर्थसंकल्पात अनेक वस्तूंवरील मूलभूत आयातकर हा घटवला आहे. वस्त्रोद्योग, पादत्राणे आणि सागरी उत्पादने या क्षेत्रांत कच्चा माल व सामग्री आणण्यासाठी होणार्या खर्चात यामुळे कपात होणार आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्कांमुळे ज्या ज्या रोजगारप्रधान क्षेत्रांना झळ पोहोचणार आहे, त्यांचा विचार केलेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत भारतीय माल टिकून राहू शकेल. अर्थसंकल्पात एकूण भांडवली खर्चात ४७ टक्के वाटा हा रेल्वे आणि महामार्गांचा आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्गांसाठी २ लाख ९४ हजार कोटी रुपये, तर रेल्वेकरिता २ लाख ७८ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

यामुळे देशातील कारखानदारीत त्यांचा कच्चा माल वेगाने आणला जाईल आणि तयार माल त्याच गतीने बाजारात पाठवता येईल. निर्यातदारांच्या दृष्टीनेदेखील हे लाभदायक आहे. विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अर्थसंकल्पात १२ लाख २१ हजार कोटी रुपयांचा भांडवली खर्च करण्यात येणार आहे. यात इतर सहायक अनुदानांची भर टाकली, तर एकूण जीडीपीतील या खर्चाचे प्रमाण आता ४.४ टक्के इतके झाले आहे. २०१७-१८ मध्ये ते केवळ २.७ टक्के होते. पायाभूत सुविधांसाठी एक रुपया खर्च केला, तर जीडीपीत अडीच ते साडेतीन रुपयांची वाढ होते, असे आर्थिक पाहणी अहवालातच म्हटलेले होते. खरे तर, कधी तेजी, तर कधी मंदी. कधी उत्साह, तर कधी नरमाई. कधी खरेदी, तर कधी विक्री. कधी गर्दी, तर कधी बाजार ओस, असे घडतच असते. गतवर्षीही अर्थसंकल्पानंतर घसरण झालीच होती. १९९६ साली अशीच उतरण पाहण्यात आली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी चीनसह अन्य देशांवर भरमसाट कर लावण्यास सुरुवात केल्यामुळे, व्यापारयुद्ध भडकले होते आणि त्याचे प्रतिबिंब भारतीय भांडवली बाजारातही पडले.

परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी गेल्या वर्षीच्या फेब्रुवारीतदेखील ३३ हजार कोटी रुपयांवर समभागांची विक्री केली होती. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या गतवर्षीच्या अर्थसंकल्पामुळे देशातील करोडो मध्यमवर्गीय मात्र आनंदी होते. परंतु, भारतीय शेअर बाजारात याच्या अगदी उलटा परिणाम दिसत होता! प्रत्यक्षात वर्षभरात आर्थिक विकासाचा दर जगात सर्वाधिक, म्हणजे ७ टक्के राहण्याचाच अंदाज आहे. सार्वजनिक खर्चाच्या बळावरच विकास सुरू आहे; मात्र खासगी गुंतवणूक अपेक्षेइतकी वाढत नाही. ती वाढावी, यासाठी अर्थमंत्री वारंवार आवाहन करत आहेत. योग्य ती पावलेही टाकत आहेत. मात्र, भारताने युरोपीय महासंघ, ब्रिटन आदी अनेक देशांशी केलेल्या व्यापार करारांमुळे मध्यम आणि दीर्घकालीन मुदतीत भारताचे भविष्य आशादायीच आहे.

# रयत परीवाराला दादांची पदोपदी आठवण येत राहील : आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचा बहुजनांच्या शिक्षणातून राष्ट्रनिर्मितीचा विचार अजितदादांनी आपल्या कार्यातून जपला. ज्या ज्यावेळी शासन दरबारी रयत शिक्षण संस्थेला अडचणी आल्या त्या अडचणी सोडविण्यासाठी स्व.अजितदादांचा मोठा हातभार लागला आहे. त्यामुळे रयत परीवाराला स्व.दादांची पदोपदी आठवण येत राहील अशा शब्दात रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे अध्यक्ष आ.आशुतोष काळे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री स्व. अजितदादा पवार यांना मंगळवार (दि.०३) रोजी श्रद्धांजली वाहण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या अहिल्यानगर शहरातील उत्तर विभागीय कार्यालयात रयत शिक्षण संस्थेच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उत्तर विभागाचे अध्यक्ष आ.आशुतोष काळे यांनी आपल्या भावना व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली.




यावेळी आपल्या भावना व्यक्त करतांना विभागीय अध्यक्ष आ.आशुतोष काळे यांनी सांगितले, सामान्य माणूस हा स्व.अजितदादांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचवण्याचा त्यांचा ध्यास होता. सत्ता येते आणि जाते, पण माणसाच्या मनात निर्माण केलेली आपुलकी, विश्वास आणि आधार कायम राहतो हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. स्व.दादांनी रयतच्या अनेक शाखांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला असल्याचे त्यांनी सांगितले.याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन दुरदृश्य प्रणालीडरे, तसेच उपाध्यक्ष अरुण कडू, मा.आ.बबनराव पाचपुते,मा.आ.दादाभाऊ कळमकर, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जनरल बॉडी सदस्य, विभागीय अधिकारी, सहविभागीय अधिकारी, उत्तर विभागाचे सर्व शाखा प्रमुख, रयत सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये प्रवराचे विद्यार्थी चमकले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** जगप्रसिद्ध 'टाटा मुंबई मॅरेथॉन' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत लोणी (ता. राहाता) येथील प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम फिजिओथेरपी कॉलेजच्या ५३ विद्यार्थ्यांनी 'ऑन-फिल्ड फिजिओथेरपिस्ट' म्हणून उत्कृष्ट सेवा देत प्रवराचा नावलौकिक उंचावला आहे. कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.के. सिन्हा यांनी या कामगिरीची माहिती दिली.

नुकत्याच झआलेल्याया जागतिक स्पर्धेत जगभरातून सुमारे ७५ हजारांहून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला होता. या अफाट गर्दीत आणि आव्हानात्मक परिस्थितीत प्रवराच्या विद्यार्थ्यांनी 'क्विक रिस्पॉन्स टीम'सोबत (टढ) समन्वय साधत बेस कॅम्पसह संपूर्ण मॅरेथॉन मार्गावर धावपटूंना तात्काळ वैद्यकीय आणि फिजिओथेरपी सेवा पुरव ली.




विद्यार्थ्यांनी मेडिकल स्पॉटर्स, दुचाकीवरील मेडिक्स आणि फिल्ड रिस्पॉन्स टीमसोबत काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. ''या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना क्रीडा फिजिओथेरपी क्षेत्रातील कार्यपद्धती, ताणतणाव व्यवस्थापन, तातडीच्या दुखापतींवरील उपचार आणि संघभावनेतून काम करण्याचे प्रत्यक्ष अनुभवातून मोलाचे धडे मिळाले,'' अशी प्रतिक्रिया विभआग प्रमुख डॉ. प्रदीप बोरकर यांनी व्यक्त केली.

या मोहिमेसाठी विद्यार्थ्यांना डॉ. आर.के. सिन्हा, डॉ. अय्याज आशाई, डॉ. प्रदीप बोरकर आणि क्रिडा संचालक डॉ. सुनील बुलार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशस्वी सहभागाबद्दल प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील आणि विश्वस्त ध्रुव विखे पाटील यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# फायनान्स कंपनीने सील केलेल्या घराचे सील तोडल्या प्रकरणी दोघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** फायनान्स कंपनीने कर्ज वसुलीसाठी राहुरी तालुक्यातील वांजुळपोई येथील एक घर ताब्यात घेऊन सील केले होते. मात्र आरोपींनी सदर सील तोडुन घराचा ताबा घेतल्याचे आढळून आल्याने फायनान्स कंपनीकडून राहुरी पोलीस ठाण्यात दोघां जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

भारत तुळशिराम खरात, वय २९ वर्षे, हे अहिल्यानगर येथील सावेडी हडको येथे राहात असून ते मोतीलाल औसवाल होम फायनंनस लिमीटेड शाखा अहील्यानगर येथे लिगल मॅनेजर म्हणुन खाजगी नौकरी करतात. दि. २८ ऑक्टोबर २०१६ रोजी गणेश ठोसर व सविता ठोसर, दोघे रा. वांजुळपोई, ता. राहुरी, यांनी त्यांचे मालकीची वांजोळपोई येथील राहते घर मोतीलाल औसवाल होम फायनंन्स लिमिटेड शाखा अहिल्यानगर या फायनंन्स कंपनीकडे तारण ठेवून १२ लाख ७३ हजार ४०४ रुपये कर्ज घेतले होते. त्याचे मासिक हप्ता १६ हजार ६५७ रु. होता. सुरुवातीचे काळात त्यांने घेतलेल्या कर्जाचे हप्ते दि. ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत भरले. त्यानंतर नमुद हप्ते हे भरत नसल्याने फायनान्स कंपनीकडून न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करुन न्यायालयाच्या आदेशाने दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी सदर राहते घरास सील करुन ताबा घेवुन त्या कंपणीचे प्राधीकृत अधिकारी पल्लवी केतन पाटील यांना ताबे पावती इन्वेन्टरी आणि पंचनामा सह ताबा सुपूर्त केला. त्यांनतर दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास फायनान्स कंपणीचे कर्मचारी सद्दाम इक्रम शेख यांनी कर्जदार यांचे ताबा झालेल्या मालमत्तांचे ठिकाणी वांजोळपोई येथे जावुन पाहणी केली. तेव्हा कर्जदार यांनी कंपणीचे ताब्यात घेण्यात आलेल्या घराचे कुलूप तोडुन अनाधिकृतपणे तेथे राहत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

त्यानंतर भारत तुळशिराम खरात यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी गणेश नामदेव ठोसर व सविता गणेश ठोसर, दोघे रा. वांजुळपोई, ता. राहुरी, या दोघांवर गुन्हा रजि. नं. ९४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३ (५), ३२९ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# मुकिंदपूर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुनीता उपळकर बिनविरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** राजकीयदृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या नेवासाफाटा मुकिंदपूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ.सुनीता भिमराज उपळकर यांची मंगळवार (दि.३) रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत खेळीमेळीच्या वातावरणात सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.




मुकिंदपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंचपद ठरल्याप्रमाणे फिरते ठेवण्यासाठी आणि सर्वांना समान संधी मिळण्यासाठी या ग्रामपंचायतीचे उपसरपंच कानिफनाथ गोरक्षनाथ कराडे यांनी आपल्या उपसरपंचपदाचा राजीनामा देवून सौ. सुनीता उपळकर यांची या झालेल्या बैठकीत बिनविरोध निवड केली ग्रामविकास अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संतोष खंडागळे यांनी त्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाल्याची घोषणा यावेळी केली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुकिंदपूर ग्रामपंचायतच्या लोकनियुक्त सरपंच कल्पना सतिष निपूंगे या होत्या.यावेळी ग्रामपंचायत सदस्या वर्षा केदारे, भारती करडक, मंजना खंडागळे, सुनीता निपूंगे, प्रताप हांडे, विजय कांबळे, दीपक डमाळे, नंदा निपूंगे, अमोल घुले,मंदा इंगळे आदी सदस्य यावेळी बैठकीस उपस्थित होते.

# अकोले तालुक्यातील पर्यटन विकासाला वाढीव निधी द्यावा : ना. विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांमधील विजेची समस्या लक्षात घेवून त्या पाड्यांमध्ये सोलार हायमास्ट बसविणे, सोलार स्ट्रीट लाईट बसविणे, पाणी पुरवठा योजनेकरीता सोलार पंप बसविणे, जिल्ह्यातील आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळांना स्वच्छतागृहे बांधणे व अकोले तालुक्यातील पर्यटनाच्या विकास योजनेकरीता वाढीव निधी देण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०२६-२०२७ प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उइके यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठकीचे दूरदृष्य प्रणाली डरे करण्यात आले होते. अहील्यानगर जिल्ह्याच्या आढावा बैठकीत ना. डॉ. राधाकृष्ण विखे , खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ.डॉ. किरण लहामटे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रकल्प अधिकारी श्रीमती. देवकन्या बोकडे व इतर सर्व शासकीय यंत्रणेचे अधिकारी सदर बैठकीस उपस्थित होते.




दर बैठकीत जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन २०२६-२०२७ राज्यस्तर प्रारूप आराखडे अंतिम करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने सादरीकरण केले.

ना. डॉ. राधाकृष्ण विखे महोदयांनी जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांमधील विजेची समस्या लक्षात घेवून त्या पाड्यांमध्ये सोलार हायमास्ट बसविणे, सोलार स्ट्रीट लाईट बसविणे, पाणी पुरवठा योजनेकरीता सोलार पंप बसविणे, जिल्ह्यातील आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळांना स्वच्छतागृहे बांधणे व अकोले तालुक्यातील पर्यटनाच्या विकास योजनेकरीता वाढीव निधी देणे बाबतच्या सूचना बैठकी दरम्यान केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे आदिवासी विकास विभागाचे उपकार्यालय सुरु करून प्रकल्प अधिकारी, राजूर यांनी आठवड्यातून किमान एक दिवस व इतर आवश्यक कर्मचारी यांनी उपकार्यालयात कामकाज करणे बाबतचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात उपकार्यालय सुरु असल्याबाबत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना व जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी यांना कळविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या.

बैठकीत मार्गदर्शन करताना आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत एक शासकीय आश्रमशाळा मॉडेल स्कूल बनविण्याचे निर्देश दिले व सदर मॉडेल स्कूल पालकमंत्र्यांनी दत्तक घेण्याची विनंती केली.

आदिवासी महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योजकता वाढवून त्यांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करणे व सदर कामास प्राध्यान्य देणे, राणी दुर्गावती महिला सबलीकरण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, आदिवासी व ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागातही ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

# पहिल्या सभेपासून चांगल्या प्रथा सांभाळल्या जाव्यात

श्रीरामपूर नगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीच्या नंतर पहिली सर्वसाधारण सभा उद्या पाच फेब्रुवारी रोजी नूतन नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष अनुक्रमे करण जयंतराव ससाणे व सौ. कांचन दिलिप सानप यांच्या प्रमुख अधिपत्याखाली संपन्न होत आहे.तशी पहिली सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी दोन वाजता संपन्न झाली आहे त्या सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्ष तसेच स्वीकृत नगरसेवक यांची निवड करण्यापूरती ती सभा मर्यादित होती.

शहराच्या नगरपालिकेची सर्वसाधारण सभा म्हटली म्हणजे प्रत्येक नागरिकाला मोठी उत्सुकता व आम जनतेसाठी काय निर्णय घेतात याबाबत ओढ असते.अनेक उत्साही नागरिक सभेचे कामकाज पाहण्यासाठी पब्लिक गॅलरीत उपस्थित असतात.

वार्तांकनासाठी पत्रकारांची ही मोठी उपस्थिती असते. अनेक वेळाविरोधासाठी विरोध म्हणून नको ते मुद्दे उपस्थित करून सभेचा रंग बदलून जाईल अशा चर्चा घडवून आणल्या जातात . मूळ विषय पत्रिकेवरील क्रमानुसार चर्चा न करता मध्येच नवीन मुद्दा आणून सभागृहाचा वापर आपल्या आग्रही प्रचारासाठी विरोधकांकडून केला जातो अशा बाबी अनेक वेळा स्वर्गीय जयंतराव ससाणे ,श्रीमती राजश्रीताई ससाणे श्रीमती अनुराधाताई आदिक यांच्या काळातही घडल्या आहेत. स्वर्गीय जयंतराव ससाणे यांची प्रशासनावर पकड असल्याने तसेच त्यांच्या अनुभव कुशलते ते सभेचे कामकाज रेटून नेत असत.

नागरिकांच्या हिताचे व शहराचे वैभव वाढवणारे निर्णय सर्वसाधारण सभेत घेतले जावेत अशी अपेक्षा असते परंतु सभेचे कामकाज आरडाओरड व आपलेच मुद्दे रेटून नेण्यासाठी विरोधक करतात , त्यामागे केवळ आपल्या गटाचे अथवा पक्षाचे राजकारण

असते.सभागृहात जोपर्यंत पत्रकारांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात

असते तो पर्यंत कोलाहल आधिक चालतो. पत्रकारांनाही न्यूज व्हलयू म्हणून सत्ताधाऱ्यां पेक्षा सभागृहात चाललेल्या आरडाओरड व गोंधळाची दरवल घ्यावी लागते. पत्रकार निघून गेले की कोलाहल सुद्धा कमी होतो. लोकहिताचे मुद्दे उचलून धरून त्यावर चर्चा घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य विरोधकाकडून होत असते यात शंका नाही तथापि खिंडीत गाठून विषय पत्रिकेचे भान न ठेवता विषय मांडणे अडचणीचे ठरते. मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवा ही सभागृहात मागणी होते तर त्यात काही गौडबंगाल असल्यास किंवा ते अपूर्ण असल्यास '' पुढचे विषय घ्या'' असे सांगत इतिवृत्त मंजूर झाल्याचे जाहीर करून टाकतात. विरोधकांनी अभ्यासपूर्ण प्रश्न विचारावेत संबंधित समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अथवा संबंधितांनी त्याला समर्पक उत्तरे द्यावीत. सभागृहाचे कामकाज हे विचारमंथन ठरावे म्हणजे शहराचा कारभार जनताभिमुख व

पारदर्शी होऊन शहराला न्याय मिळेल.

. शासनाच्या नवीन पॅटर्ननुसार या वेळच्या झालेल्या निवडणुकात महिला सदस्यांची संख्या ५०% आहे म्हणजेच आता सभागृहात चालणाऱ्या कामकाजाबाबत महिलांकडून मोठ्या प्रमाणात अपेक्षा आहेत म्हणजेच महिलांचे व्यक्तिमत्व आधिक अभ्यासू व प्रशासन कुशल बनावे.महिला प्रतिनिधी असल्यास त्यांनाच त्यांचे कामकाज करू द्यायचे आहे त्यांच्या कुटुंबातील कुणाही व्यक्तीने त्यांच्या कामात अडथळा लुडबुड करू नये किंवा पालिका प्रशासनात हस्तक्षेप करू नये व आपला व्यक्ति प्रभाव दाखवू नये यासाठीही कायदेशीर तरतूदी प्रशासनाने केलेल्या आहेत हे सर्वांना माहित आहे.

नव्याने निवडून आलेले सर्व सदस्य तरुण आणि अभ्यासू आहेत .त्यात काही जण भरपूर अनुभव असलेले आहेत. नूतन नगराध्यक्षांचे माता-पिता यांनी शहरांचे नगराध्यक्षपद दिर्घकाळ भूषविलेले असल्याने विद्यमान नगराध्यक्ष करण ससाणे

यांना अनुभवाचा कौटुंबिक वारसा मोठा आहे त्यामुळे त्यांना अनुभव नाही असे म्हणता येणार नाही. उपनराध्यक्षा सौ कांचन सानप अनुभवी नगरसेवक असून त्यांच्या कामातून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे एवढेच नव्हे तर त्यांनी पांच वर्ष नगराध्यक्षपद भूषविलेल्या अनुराधा आदिक यांचा पराभव केला

आहे ही पण मोठी ओळख आहे. स्विकृत नगरसेवक पदी ज्येष्ठ नगरसेवक व उपनराध्यक्ष पद भूषविलेले वजनदार समाजसेवक अंजुम मुसा शेख हे नगराध्यक्ष करण ससाणेयांच्या साथीला आहेत. श्रीनिवास बिहाणी हे उपनगराध्यक्ष पद भूषविलेले खंबीर नेते व मार्गदर्शक सभागृहात स्विकृत सदस्य महणून आहेत. डॉ. दिलीप शिरसाठ तज्ज्ञ आर्थो पिडीक व समाजसेवक स्विकृत सदस्य आहेत. गोपाल लिंगायत हे ससाणे कुटुबियांच्या जवळचे तरुण- तडफदार व कुशल संघटक स्विकृत सदस्य आहेत. एकूणात सर्व पालिकेतील निवडून आलेली टीम तडफदार आहे. स्वीकृत नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या पैकी श्रीनिवास बिहाणी, डॉ. दिलिप शिरसाठ (आर्थो) अंजुम शेख तसेंच महिला व बालकल्याण समितीच्या प्रमुख मंजुश्री मुरकुटे यांनी आपापल्या पक्षाकडून व नेत्यांकडून योग्य ती मदत व पाठबळ पालिकेला मिळवून देण्याचे आश्वासन सभागृहात जाहिरपणे दिले आहे. आता कामकाज करतांना चांगल्या प्रथा परंपरा निर्माण करणे पालिका कारभाऱ्यांच्या हातात आहे.

**पद्माकर शिंपी,**
**पत्रकार , श्रीरामपूर**
**९४२३७८५८७४**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## गोपाळ महाराज उरळकर यांना डॉ. विखे स्मृती संत सेवा पुरस्कार



**प्रवरानगर** : वारकरी संप्रदाय व संत सेवेत दीर्घकाळ अतुलनीय कार्य केल्याबद्दल उरळ (ता. अकोले) येथील निष्काम कर्मयोगी, ज्येष्ठ कीर्तनकार हभप गोपाळ महाराज उरळकर यांना यावर्षीचा राज्यस्तरीय पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ रोजी लोणी बुद्रुक (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथे प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती निवड समितीचे अध्यक्ष महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी दिली. जगद्गुरू संत तुकाराम महाराज सेवा ट्रस्टतर्फे सन २०१७ पासून दिला जाणारा हा पुरस्कार राज्यातील प्रतिष्ठेचा मानला जातो. गेली पाच दशके कीर्तन, प्रवचन, दिंडी व पालखी सोहळ्यांमधून संत विचार समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य गोपाळ महाराज उरळकर यांनी केले आहे. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, स्मृतिचिन्ह व ५१ हजार रुपये असे आहे.

## हरिगांव येथे संत रविदास महाराज जयंती साजरी



**शिरसगाव** : हरेगाव येथे संत शिरोमणी रविदास महाराज जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी हरेगाव शेतकरी संघटनेचे नेते,सतीश नाईक, ग्रा.प.सदस्य सुनिल शिनगारे, उप सरपंच दिलीप त्रीभुवन , राजू चव्हाण, दिपक चव्हाण,संजय चव्हाण ,आशिष जाधव,आकाश सूर्यवंशी,अतुल भालेराव, संदीप धनेधर, संजय महाले,व्हासळे गुरुजी,अशोक बनकर, शेळकबाबा, मारुती शरणागत,नाना लिहिणार, काळू बावसकर,अरुण बनसोडे, ग्रा.प.सदस्य रमेश भालेराव, दिपक गुलाब पठारे, सुनिल काळसाईत संजय वाघमारे किशोर धोत्रे अय्यज शेख ,नाना कापसे हे उपस्थितीत होते. आभार आकाश मकासरे यांनी मानले,सूत्र संचालन भालेराव यांनी केले, मोठ्या संख्येने युवक महिला ,नागरिक ,यांनी सहभाग घेतला .

## रविवारी गजानन महाराज प्रगट दिन सोहळा



**श्रीरामपूर** : श्री गजानन महाराज प्रगट दिनाचा धार्मिक सोहळा रविवार, दि. ८ फेब्'वारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज पथ, किशोर टॉकीज समोरील गिरमे चाळ येथे भाविकांच्या वतीने साजरा करण्यात येणार आहे. प्रगट दिनानिमित्त डुचे यांच्या निवासस्थानी भक्तांच्या उपस्थितीमध्ये सोहळा साजरा होणार असून भजन, होमहवन व महापुजा सेवेकरांच्या वतीने होणार आहे. सोहळ्यास भाविकांनी सेवेकर्यांनी उपस्थित रहावे. प्रगट दिनाचे सोहळ्यानिमित्त श्री सत्यनारायण महापुजा होईल. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद, भंडारा देण्यात येणार आहे गजानन महाराज प्रगटदिन सोहळ्यात भाविकांनी, सेवेकर्यांनी रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेवेकरी भक्तांनी केले आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करून पळून नेणारा अखेर जेरबंद

**संगमनेर** :तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून फरार झालेला कलीम अकबर पठाण (वय २२ वर्षे, रा. जमजम कॉलनी संगमनेर) याला स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत जेरबंद केले आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून त्याला पोलिसांनी गजाआड केले आहे. संगमनेर तालुक्यातील एका गावातील एका १३ वर्षीय मुलीचे कलीम अकबर पठाण याने पाच महिन्यापूर्वी अपहरण करून तिला पळवून नेले होते त्यानंतर पोलीस पठाण याचा शोध घेत होते परंतु सापडत नव्हता अखेर जिल्हा गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी आणि त्यांचे पथक शोध घेत असताना या गुन्ह्या तील अपहरणकर्ता करीम पठाण आणि पीडित मुलगी हे दोघे झरेकाठी येथून देवगाव मार्गे संगमनेर येथे येणार असल्याची माहिती कबाडी यांना मिळाली त्यांच्या विशेष पोलीस पथकाने त्या दोघांनाही देवगाव रोडने येताना सिद्धकला हॉस्पिटलजवळ सापळा लावून पकडत जेरबंद केले. आणि सदर अल्पवयीन मुलीला बाल सुधार गुहांमध्ये ठेवण्यात आले आहे.

# दिपोत्सवाने प्रवरामाई उजळली महाआरतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री





**नेवासा** : नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज यात्रोत्सवाच्या निमित्ताने गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या उपस्थितीत सोमवारी रात्री ७ ते ८ यावेळेत झालेल्या अमृतवाहिनी प्रवरामाईच्या महाआरती सोहळ्याला संत-महंतांसह हजारो भाविकांनी हजेरी लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अमृतवाहिनी प्रवरामाता की जय'च्या गजराने येथील परिसर दुमदुमला होता.यावेळी झालेल्या दीपोत्सवाने प्रवरामाई उजळून निघाली होती.

नेवासा येथील गणपती घाटावर श्री मोहिनीराज यात्रा कमिटीच्या वतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या अमृतवाहिनी प्रवरामाईच्या आरती सोहळ्याला देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज,सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धव महाराज मंडलिक, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, नेवासा येथील रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे प्रमुख बालब्रम्हचारी ज्ञानेश्वर महाराज,घोगरगाव आश्रमाचे बालब्रम्हचारी विश्वनाथ महाराज, गहिनीनाथ महाराज आढाव,चक्रधर स्वामी आश्रमाचे महंत धनंजय मुनी महाराज,बाळू महाराज कानडे,हरी महाराज भोगे,पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात गंगा पूजन करण्यात आले.

गुरुवर्य भास्करगिरी महाराजांच्या हस्ते प्रवरामाईला साडी चोळी अर्पण करण्यात आली. गंगा आरती सोहळयासाठी नाशिक येथील गंगा-गोदावरी पंचकोटी आरती समूहातील आचार्य वेदमूर्ती अमित पंचभैय्ये, अलोक गायधनी,शेखर शुक्ल,सदानंद देव,गौरव पंचभैय्ये,पुष्कराज जोशी,शुभम भालेराव गंगापूजन व आरती सोहळयाला प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तबलावादक कृष्णा कुलकर्णी यांनी भजन प्रसंगी उत्कृष्ट संगीत साथ दिली.

गंगा आरतीच्या झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदशास्त्रसंपन्न युवा पुरोहित निखिलगुरू जोशी, अभिजित बडवे, मयूर जोशी, लक्ष्मीकांत जोशी यांनी केले. अँड. मयूर वाखुरे यांनी सूत्रसंचालन केले. गंगा आरतीला नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,उपनगराध्यक्ष अँड. संजय सुखदान,श्री मोहिनीराज मंदिर देवस्थानचे अध्यक्ष भालचंद्र बडवे, विश्वस्त जयेश बडवे,बाळासाहेब पाटील,रविंद्र जोशी, जयवंत देवचक्के,रविंद्र मुनोत,रमेश ओस्तवाल,नगरसेवक स्वप्नील मापारी,राजू काळे,जालिंदर गवळी,कृष्णा परदेशी,अनिल शिंदे,अंकुश म्हस्के,अमित मापारी, बन्सीभाऊ आगळे,अंबादास ईरले,अमित विखोना,नितीन जगताप,अनंता डहाळे,सचिन कडू यांच्यासह यात्रा कमिटीचे सदस्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय युथ व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी चाचणी श्रीरामपुरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेच्या वतीने वर्धा येथे दिनांक १९ ते २१ फेब्रुवारी २०२६ दरम्यान राज्यस्तरीय युथ (मुले व मुली) (ण-२१) व्हॉलीबॉल स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी पुणे विभागीय संघाची निवड चाचणी रविवार,दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाले पोदार स्कूल,श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे विभागीय व्हॉलीबॉल सचिव नितीन बलराज यांनी दिली.या निवड चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंची जन्मतारीख १ जानेवारी २००५ नंतरची असणे आवश्यक आहे. निवड चाचणीसाठी येताना आधार कार्ड,जन्म दाखला( मूळ )व बोर्ड पासिंग प्रमाणपत्र ही कागदपत्रे अनिवार्य आहेत. याचबरोबर अहिल्यानगर जिल्ह्यातील ण-१६ मुले व मुलींची राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी चंद्रपूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय निवड चाचणी देखील आयोजित करण्यात आली आहे.या निवड चाचणीतून अहिल्यानगर जिल्ह्यातून ५ मुले व ५ मुलींची निवड राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी करण्यात येणार आहे. या गटासाठी खेळाडूंची जन्मतारीख १ जानेवारी २०१० नंतरची असावी.ण-१६ निवड चाचणीसाठी आधार कार्ड, जन्म दाखला (मूळ), तसेच शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाइड प्रमाणपत्र आवश्यक आहे.सर्व खेळाडूंनी सकाळी १०.०० वाजता रिपोर्टिंग करणे बंधनकारक आहे.निवड चाचणी संदर्भातील अधिक माहितीसाठी नितीन बलराज,पापा शेख, धनंजय माळी, आदित्य पटारे संपर्क करावा. तसेच या निवड प्रक्रियेसाठी डॉ. संतोष पवार, कुलदीप कोंडे, शिवाजी जाधव, स्वप्नील चन्सेटी व सुनील चोलके यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.अधिकाधिक पात्र खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वडगाव पान येथील ५०० महिला अभ्यास दौऱ्यासाठी रवाना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : तालुक्यातील वडगावपान येथील ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्य मंत्री पंचायतराज अभियानां अंतर्गत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली १० वातानुकूलित बसेस मधून सुमारे ५०० महिला अभ्यास दौर्यासाठी रवाना झाल्या आहेत.

वडगावपानचे ग्रामदैवत कानिफनाथ महाराज यांना आमदार खताळ आणि सरपंच श्रीनाथ थोरात यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून ढोल-ताशांच्या गजरात या अभ्यास दौऱ्याचा शुभारंभ करण्यात आला. गावातील सुमारे ५०० महिला या अभ्यास सहलीत सहभागी झाल्या आहेत. या दौऱ्यांच्या अंतर्गत महिला पंढरपूरजवळील आदर्श ग्रामपंचायत असलेल्या गोपाळपूर ग्रामपंचायतीस भेट देऊन तेथील कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेणार आहेत. संत सावता महाराज यांची समाधी असलेल्या श्रीक्षेत्र अरण तसेच पंढरपूर, अक्कलकोट आणि तुळजापूर या पवित्र तीर्थ क्षेत्रांना भेट देण्यात येणार आहे.महिला सक्षमी करणाच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरपंच श्रीनाथ थोरात, उपसरपंच सोमनाथ गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी संजय कांहडळ, तसेच ग्रामपंचायत सदस्य सुमित काशीद, छाया काशीद, सुरेखा थोरात,सोनाली गडगे व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

> मुख्यमंत्री पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून महिलांना अभ्यास दौरे व देवदर्शनासाठी पाठविण्याचा निर्णय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वडगावपान ग्रामपंचायतीने घेतला आहे. मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व सर्व सदस्यांनी पुढाकार घेऊन हा उपक्रम राबविला आहे. हा उपक्रम स्तुत्य असून अभ्यास दौऱ्यासाठी रवाना झालेल्या महिलांचा प्रवास सुखकर होवो.
> **अमोल खताळ, आमदार संगमनेर विधानसभा**

# अश्व प्रदर्शनासाठी भरीव निधी देणार : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : देवगड खंडोबा यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अश्व व पशुपक्षी प्रदर्शनासाठी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा नियोजन समिती तून भरीव निधी वाढविण्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनांनुसार या प्रदर्शनासाठी जिल्हा नियोजनमधून भरीव स्वरूपाचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली. तालुक्यातील देवगड खंडोबा यात्रा उत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही देवगड अश्वसेवा संस्थेच्यावतीने अश्व व पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि बक्षीस वितरण आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर अयोध्या धामचे महंत एकनाथ महाराज, अहिल्यानगर पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त दशरथ दिघे, लघु पशु सर्व चिकित्सालयाचे सहायक आयुक्त भाऊसाहेब डौले, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, संगमनेर पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. पुंडलिक येवले, अकोले पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. अतुल पाटणे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे, देवगड अश्वसेवा संस्थेचे अध्यक्ष उत्तम जाधव, सरपंच सुभाष गडाख, उपसरपंच सुजाता दवंगे, ग्रामपंचायत अधिकारी हरीश गडाख, पोलीस पाटील मथाजी पावसे, शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, सरचिटणीस गणेश दवंगे, केशव दवंगे, सोमनाथ भालेराव, चंद्रशेखर गडाख, सोमनाथ दवंगे, भारत गोफणे, कैलास दिवटे, किरण पावसे, मोठ्याभाऊ बडे, सोमनाथ पावसे, बाबासाहेब पावसे, सचिन सस्कर, अण्णासाहेब काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले, श्री क्षेत्र देवगड येथे खंडोबा महाराजांच्या यात्रोत्सवानिमित भरविण्यात येणाऱ्या अश्व प्रदर्शनासाठी निधी अपुरा पडत असल्याने त्यामध्ये वाढ करावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडे निधी वाढविण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी तात्काळ मान्य करण्यात आल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. देवगड पंचक्रोशी परिसरात आतापर्यंत सुमारे ८ कोटी ४९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. माझे कुलदैवत खंडोबा महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ग्रामस्थांच्या प्रयत्नांमुळे देवगड देवस्थानाला 'ब' वर्गाचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मिळणार असून, त्या निधीतून मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास केला जाणार असल्याचा विशेष आनंद त्यांनी व्यक्त केला.

अश्वप्रदर्शन नाचकाम स्पर्धे स्पर्धेत प्रथम क्रमांक नामदेव साबळे पंढरपूर बाळासाहेब वाघ विकी वारंघुसे सागर जाधव रणजीत खोमणे, रमेश पवार, निलेश तिवारी तसेच उत्कृष्ट घोडा किरण पवार, मनोज कुटे, ईश्वर गटकळ, आदम घोडा स्पर्धेत आदित्य गायकवाड, ओमकार सांगळे, आयुष गुंजाळ , उत्कृष्ट आदण, घोडी स्पर्धेत अभिजीत खोसे, मुझमीन शेख, फैजान शेख व रेवाल चाल स्पर्धेत मोहीम खान, मुजबिल शेख, अश्पाक शेख आदींनी या स्पर्धेत आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते सन्मान पत्र व सन्मानचिन्ह बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

# 'धुरंधर' महसूल सहायक ओम खुपसे यांचा गौरव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : महसूल विभागात आपल्या कार्यतत्परतेने वेगळी ओळख निर्माण करणारे ओम खुपसे यांना 'उत्कृष्ट निवडणूक महसूल सहायक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त प्रांताधिकारी किरण सावंत पाटील आणि तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. यावेळी राज्य कर उपायुक्त अनिल काळे व पोस्टमास्तर महेश कोबरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. ओम खुपसे यांच्या कामाप्रती असलेल्या निष्ठेची प्रचिती महिन्यांपूर्वीच आली होती. त्यांची बदली शनी शिंगणापूर येथे झाली असता, श्रीरामपूरमधील बीएलओ बांधवांनी आक्रमक होत ही बदली रद्द करण्याची मागणी केली होती. सन २०२३ ते २०२५ या काळात निवडणूक शाखेत काम करताना खुपसे यांनी विधानपरिषद, लोकसभा, विधानसभा, नगरपरिषद निवडणूक, मतदार नोंदणी आणि यादी अद्यावतीकरणाची कठीण कामे अत्यंत पारदर्शकपणे पूर्ण केली. त्यांच्या याच 'धुरंधर' कार्यशैलीची दखल घेत प्रशासनाने त्यांचा गौरव केला. महसूल विभागातील कर्मचारी, अधिकारी, बीएलओ वर्गातून सध्या त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सागर बनसोडे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन मेस्टा या इंग्रजी शाळा संस्था चालक संघटनेच्या अकराव्या राज्यस्तरीय अधिवेशन कोकणठाण ज्ञानपीठ शिर्डी या ठिकाणी पार पडले. सदर अधिवेशनात मेस्टाच्या वतीने दिला जाणारा २०२६ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार बालाजी देडगाव येथील हनुमान माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक तसेच चाईल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सागर बनसोडे यांना मेस्टा संघटनेचे संस्थापक राज्य अध्यक्ष डॉ.संजय राव तायडे यांचे सह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

सागर बनसोडे यांच्या शैक्षणिक कार्याची तसेच शाळेत राबवलेल्या अनेक विद्यार्थी हिताच्या शैक्षणिक उपक्रमाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला असल्याची माहिती मेस्टा पुरस्कार निवड समितीचे प्रमुख प्रा .देविदास गोडसे यांनी दिली. रोख रक्कम,मानचिन्ह, प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# साईभक्तांची अडवणूक केल्यास कठोर कारवाई

## गुन्हे दाखल करण्याचे आदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी** : साईबाबा समाधी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची पिळवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानातूनच पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या व खासगी पार्किंगचा आग्रह धरणाऱ्या एजंटांवर आता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १५२ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

याबाबतचे सशर्त आदेश शिर्डी विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर यांनी निर्गमित केले आहेत. शिर्डीत दररोज देश-विदेशातून लाखो साईभक्त दर्शनासाठी येतात. मात्र, मंदिर परिसर व शिर्डी शहरात अनेक ठिकाणी खासगी व्यक्तींकडून सार्वजनिक रस्त्यावर भाविकांची वाहने बेकायदेशीरपणे अडवली जातात. भाविकांना खासगी पार्किंगच्या ठिकाणी वाहने घेण्याचा आग्रह धरला जातो. तसेच विशिष्ट दुकानांतून अव्वाच्या सव्वा दरात पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जाते.

यातून भाविकांची मोठी आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अनेकदा भाविकांना दमदाटी, शिवीगाळ व धक्काबुक्की करण्याचे प्रकारही घडले आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने हे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शिर्डी गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे व प्रवेश मार्गावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाहने थांबवून त्यांची दिशाभूल करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही गावातून शिर्डी येथे येणाऱ्या प्रवाशांच्या वाहनांनी विशिष्ट दुकान अथवा आस्थापनेतूनच खरेदी करावी किंवा निवास करावा, असा आग्रह आता धरता येणार नाही. कोणत्याही व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली मध्यस्थीचे व्यवहार करणाऱ्यांवरही निर्बंध लादण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

> **प्रभावित झाल्यास म्हणने मांडा**
> या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला आपली बाजू मांडण्याचा अधिकार असल्याचे प्रांताधिकारी यांनी राखून ठेवला आहे. या आदेशाने कुणी प्रभावित होत असेल त्यांना दि. १६ फेब्रुवारी पर्यंत आपली बाजू मांडता येईल, असे प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे.


## राहुरी नगरपरिषद राहुरी जि. अहिल्यानगर

### बांधकाम विभाग

जा. क्र. कावी ०३/१०३/२०२६ दिनांक ०३/०२/२०२६

### फेर ई- निविदा सुचना

मा. मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद यांचे कडुन नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठीचे निधी अंतर्गत करावयाच्या खालील कामांची फेर निविदा ई-निविदा पद्धतीने PWD / MJP / योग्य त्या वर्गात नोंदणीकृत व अनुभवी संस्था / मक्तेदार तसेच ई.पी.एफ परवाना धारक यांचेकडुन निविदा मागविणेत येत आहे. सदर कामांची फेर ई निविदा शासनाच्या https\\mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर दिनांक ०४/०२/२०२६ पासुन दिनांक ११/०२/२०२६ पर्यंत पहावयास मिळेल.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (G.S.T. वगळून) | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फि १८% G.S.T सह | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठीचे निधीतुन राहुरी नगरपरिषद हद्दीत १ ते ५ विकास कामे करणे, | ४२,२९,११९/- | १% | ४५००/- | १८० दिवस |

(टिप- सदरील निविदा वेळापत्रकातील बदल शुद्धीपत्रके यापुढे फक्त https\\mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर प्रसिद्ध करणेत येतील तसेच कोणतेही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवले आहेत)

(पराग दराडे)
नगर अभियंता
राहुरी नगरपरिषद, राहुरी

(अभिजित हराळे)
मुख्याधिकारी
राहुरी नगरपरिषद, राहुरी

## पान १ वरुन

### शालार्थ घोटाळ्यात आता संस्थाचालकांचा नंबर

करण्याची सुधारित कार्यपद्धती निर्गमित केलेली आहे. तरीही काही व्यवस्थापनाने कागदपत्रांमध्ये फेरफार, चुकीची माहिती किंवा माहिती दडपून प्रस्ताव सादर करतात. त्यामुळे या गुन्ह्यातील सहभागी सर्वांवरच कार्यवाही झाली पाहिजे. मात्र, केवळ कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई होते. मूळ नियुक्ती प्रक्रियेतील व्यवस्थापनावर ठोस कार्यवाही होत नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा शासन निर्णय ३० जानेवारीला निर्गमित केला आहे.

### लोकसभा सभापतींवर कागदाचे तुकडे भिरकावले

विषय सोडून दिला. असे रिजिजू म्हणाले. राहुल गांधी एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी पुन्हा एकदा नरवणे यांच्या आत्मचरित्राचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी त्यांना बोलण्यापासून रोखले जात असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, मी विरोधी पक्षनेता आहे, मला बोलू द्या. पूर्व लडाखमध्ये भारतीय सैनिक मारले, असा उल्लेखही त्यांनी केला. यावेळी लोकसभेत गोंधल निर्माण झाला. या गोंधळावरुन आता आठ खासदारांवर निलंबनाची कारवाई केली आहे. पाकिस्तानच्या संसदेत प्रश्न विचारायचे का?

देशाच्या संसदेत प्रश्न मांडायचा नाही तर मग कुठे मंडायचा, संसदेत खासदारांनाच बोलू देत नाहीत, आपल्याच संसदेत बोलू दिलं जात नाही. आपण आपल्या संसदेत विषय मांडायचा नाही मग पाकिस्तानच्या संसदेत जाऊन भाजपने मांडायचा का? की चीनच्या संसदेत जाऊन हा विषय मांडायचा? नरवणे यांच्या पुस्तकात काय लिहिल आहे, हे समोर यायला पाहिजे, असे म्हणत शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी राहुल गांधींच्या भूमिकेचे समर्थन केले.

### नाशिक अहिल्यानगर सोलापूर महामार्गास मंजुरी

'पीएम गतीशक्ती' राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत विकसित होणारा हा महामार्ग पश्चिम किनारपट्टीपासून दक्षिण भारतापर्यंतचा एक महत्त्वाचा दळणवळण दुवा ठरणार आहे. परिणामी राज्यातील आणि देशातील प्रमुख आर्थिक केंद्रांशी अहिल्यानगरचा संपर्क अधिक वेगवान व सुलभ होणार आहे. महामार्गामुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे ४५ टक्के घट होण्याची शक्यता असून, त्याचा थेट लाभ व्यापार, शेती आणि उद्योग क्षेत्राला मिळणार आहे. शेतमाल, दुग्धव्यवसाय तसेच कृषीपूरक उद्योगांच्या वाहतुकीवरील खर्चात लक्षणीय बचत होणार असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) लॉजिस्टिक्स अधिक सक्षम होणार आहे. यासोबतच औद्योगिक, गोदाम, प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रात नव्या गुंतवणुकीस चालना मिळणार असल्याचे अपेक्षित आहे.

### 'एमसीए'मध्ये पवार कुटुंबातील ४०० आजीवन सदस्य नोंदवले!

करून घेण्यात आलेत. त्याचबरोबर अनेक राजकीय नेते आणि शैक्षणिक संस्थांना देखील ऐन निवडणुकीच्या तोंडावर सदस्य करून घेण्यात आलेय असा आरोप केदार जाधव यांनी केला होता. निवडणूक स्थगितीवर आज सुनावणी रोहित पवारांच्या या कारभाराच्या विरोधात केदार जाधवसह लातुर जिल्हा क्रिकेट असोसिएशन , महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य अनंत माटे , पुण्यातील एस पी महाविद्यालय यांनी या निर्णयाला आव्हान देत स्वतंत्रपणे या निवडणुकीला स्थगिती देण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. त्यावरती निर्णय देताना न्यायालयाने ६ जानेवारीला होणारी निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय दिलाय. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ फेब्रुवारीला होणार असून तोपर्यंत एमसीएच्या निवडणूक प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली होती. यानंतर रोहित पवार यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. आता सुप्रीम कोर्टाच्या संतापानंतर रोहित पवार यांनी याचिका काढून घेतली.

### लाडकी बहिण योजनेला अजित पवारांचे नाव द्या

बहिणींची ही आगळीवेगळी आदरांजली ठरणार असल्याचे ते म्हणाले. दरम्यान, राज्यातील लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय एकनाथ शिंदे थांबणार नाही. दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला आहे. लाडक्या बहिणींना आम्ही लवकरच २१०० रुपये देणार आहोत असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलंय. तर दुसरीकडे लाडकी बहीण योजनेसाखऱ्या योजनांमुळे राज्यांची महसुली तूट वाढत आहे, महाराष्ट्र हे महसुली तुटीमध्ये गेलं असल्याचं निरीक्षण यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालात मांडण्यात आलं. जून २०२४ ला जेव्हा योजना सुरु झाली, तेव्हापासूनच ती वादात आणि राजकारणात अडकून आहे. कधी नावं कपात केल्यामुळे, कधी ई-केवायसीमुळे, तर कधी इतर विभागाचे निधी योजनेसाठी वळवल्यामुळे. कारणं काहीही असो.. वाद कितीही असो.. योजना बंद केली जाणार नाही असं महायुती सरकारनं स्पष्ट केलंय. लाडक्या बहिणींना महिन्या पैसे मिळत राहणार असं सत्तेत बसलेला प्रत्येक नेता आजही सांगतोय.

# अजितदादा दूरदृष्टी असलेले नेते : प्राजक्त तनपुरे

## दादांना सर्वपक्षीय आदरांजली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** ग्रामीण प्रश्नांची जाण असलेले, प्रशासनावर मजबूत पकड ठेवणारे, शिस्तप्रिय तसेच शब्दाचे व वेळेचे पक्के असलेले नेते अजितदादा पवार आज आपल्यात नाहीत, हे अजूनही खरे वाटत नाही. अत्यंत दूरदृष्टी असलेल्या या नेत्याच्या निधनाने राज्याची मोठी हानी झाली असून ही पोकळी कधीही भरून निघणार नाही, असे भावनिक उद्गार माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी यावेळी काढले.




सोमवारी सकाळी राहुरी येथील स्टेशन रोडवरील मंगल कार्यालयात अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे म्हणाले की, मंत्रालयात काम करत असताना अजितदादांची एकही बैठक कधी रद्द झाली नाही. त्यांच्याकडून मला खूप काही शिकता आले. पक्ष वेगळे झाल्यानंतरही विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी मला फोन करून आपल्या पक्षातून निवडणूक लढवण्याची ऑफर दिली होती. मात्र मी पवार साहेबांच्या पक्षाकडून निवडणूक लढवली आणि त्यात पराभूत झालो.

# राहाता - पानोडी रस्त्याबाबत व्यापाऱ्यांना दिलासा : ना. विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** या वर्षी बजेटमधून देशाच्या आणि राज्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे. जागतिक पातळीवर भारताचा डंका वाजत असून, यामुळे भविष्यात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी आता गावातील गट-तटाच्या राजकारणातून बाहेर पडून आपल्या मुलांच्या शिक्षणाचा आणि भविष्याचा विचार करावा, असे कळकळीचे आवाहन राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी केले.

आश्वी खुर्द येथील निलेश भवर यांच्या वस्तीवर आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ना. विखे बोलत होते. यावेळी त्यांनी केंद्रीय अर्थसंकल्प, रस्ते विकास, वीज प्रश्न आणि सामाजिक सलोखा यावर सविस्तर भाष्य केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा बँकेचे संचालक बापुसाहेब गायकवाड होते.गट-तट सोडा, मुलांच्या भविष्याचा विचार करा गावातील सामाजिक वातावरणावर भाष्य करताना ना. विखे यांनी ग्रामस्थांना मोलाचा सल्ला दिला. ते म्हणाले, ''गावातील गट-तटाच्या राजकारणातून बाहेर पडा. गावाची भांडणे गावातच समोपचाराने सोडवा, त्यासाठी कोर्ट-कचेरीची पायरी चढू नका.

आज अमेरिका असो वा इतर देश, सर्वजण पंतप्रधान नरेंद्र मोदींना सन्मानाने निमंत्रित करत आहेत. भारताची ही जागतिक प्रतिमा उंचावल्यामुळे भविष्यात आपल्या तरुणांना रोजगाराच्या प्रचंड संधी मिळणार आहेत. त्यामुळे पालकांनी आता क्षुल्लक वादात वेळ न घालवता आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत आणि उज्ज्वल भविष्याबाबत विचारमंथन करावे.

भयभीत होऊ नका, रस्त्यासाठी सर्वसमावेशक मार्ग काढू राहाता ते पानोडी रस्त्याच्या कामासंदर्भात आश्वी खुर्द येथील व्यापाऱ्यांना आलेल्या नोटिसांबाबत बोलताना त्यांनी दिलासा दिला.

''विकास कामे होणारच आहेत, पण त्यासाठी कोणाचे नुकसान केले जाणार नाही. व्यापाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी भयभीत होऊ नये. पावसाचे पाणी दुकानात किंवा घरात शिरू नये यासाठी गटार 'अंडरग्राउंड' करून आणि रस्ता खोदून खाली घेण्यासाठी प्रयत्न करू. यातून सर्वसमावेशक मार्ग काढला जाईल,'' असे आश्वासन त्यांनी दिले.

शिर्डी एमआयडीसीत ५०० एकरात डिफेन्स हब तरुणांच्या रोजगाराविषयी बोलताना ते म्हणाले की, ''शिर्डी एमआयडीसी आणि राहुरी विद्यापीठाच्या जागेवर ५०० एकरात संरक्षण साहित्य निर्मितीचे प्रकल्प येत आहेत.

## निधन वार्ता

### मीराबाई गवारे



**शिरसगाव :** येथील गं.भा.मीराबाई भास्कर गवारे (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे ४ मुले नातवंडे असा परिवार आहे. सतीश,मधुकर,गोकुळ,कृष्णा,यांच्या त्या मातोश्री होत.

### संपतराव बोरकर



**संगमनेर :** अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे माजी रजिस्टार तसेच जोर्वे येथील सामाजिक कार्यकर्ते संपतराव बोरकर (वय ७१) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी मुलगा भारत कॅप्टन दौलत तीन भाऊ बहीण असा मोठा परिवार आहे.

### फकरुद्दीन मुलाणी



**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील करंजेपूल येथील फकरुद्दीन समशेर मुलाणी यांचे निधन झाले ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहीत मुले नात नातवंडे असा मोठा परिवार आहे. आरोग्य विभागात कार्यरत असलेले फिरोज मुलाणी, परवेझ मुलाणी तसेच समीर मुलाणी यांचे ते वडील होत.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामध्ये विना अपघात सलग ३५ चालक म्हणून त्यांचा गौरव झाला होता.

# रेल्वे उड्डाणपुलावरील अपघात रोखण्यासाठी सार्वजनिक बांधकाम सरसावले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर-नेवासा रोडवरील (रा.मा. ४५) 'एस' आकाराच्या उड्डाणपुलावर वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभागाने तातडीची उपाययोजना हाती घेतली आहे. विभागाने अधिकृत पत्र काढून सुरक्षा कामांना गती दिल्याचे जाहीर केले आहे.



अतिवेग, अपुरी दृश्यता आणि रात्रीच्या वेळी प्रकाशाचा अभाव हे मुख्य कारण असल्याचे भारतीय लहुजी सेनेच्या मागणीनंतर पोलीस निरीक्षक व सार्वजनिक बांधकाम यांच्या संयुक्त पाहणीत स्पष्ट झाले होते. यानंतर पुलाच्या दोन्ही बाजूंना 'अपघात प्रवण क्षेत्र'चे फलक लावण्यात आले आहेत. दृश्य अडथळा निर्माण करणारी झाडे-झुडपे तोडण्याचे काम सुरू आहे.तसेच स्पीड ब्रेकर, कॅट आय रिफ्लेक्टर, संरक्षक बॅरिअर, वेग नियंत्रण व मार्गदर्शक फलक बसविले जाणार आहेत. भविष्यात पुलाच्या मध्यभागी रेलिंग बसवून वाहतुकीचे सेंट्रलायझेशन करण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे. या उपाययोजनांमुळे गंभीर अपघात मोठ्या प्रमाणात कमी होतील, असा विश्वास सार्वजनिक बांधकामने व्यक्त केला आहे.

भारतीय लहुजी सेनेच्या उपोषणाला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने नागरिकांमध्ये समाधान आहे. सेनेने सर्व कामे वेळेत व दर्जेदार पूर्ण करण्याची मागणी केली असून वाहनचालकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# प्रकाश भोंडगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील सामाजिक कार्यकर्ते त्रिंबक भोंडगे यांचे सुपुत्र तथा भारतीय सैन्य दलातील हवालदार प्रकाश त्र्यंबक भोंडगे हे नुकतेच देशसेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या




गौरवार्थ ग्रामस्थ, ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सोसायट्या, शैक्षणिक संस्था तसेच श्रीरामपूर तालुका माजी सैनिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने भव्य सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा येथील त्र्यंबकेश्वर मंदिराच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.प्रकाश भोंडगे व त्यांचे बंधू मारुती भोंडगे हे दोघेही भारतीय सैन्य दलात देशसेवा करत असून, त्यांच्या कुटुंबाचा राष्ट्रसेवेत मोठा वाटा आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME JARINA BEGAM ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS JARINA JAMIL PATHAN (AADHAR NO. 8517 4083 3253) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE: KOPARGAON DATE : 03/02/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME MANSURI ANISABI ISAK (NAME BEFORE MARRIAGE) TO NEW NAME AS PATHAN ANISA ASLAM (NAME AFTER MARRIAGE) VIDE AADHAR NO.2730 1588 3307

# मुर्शतपुर ग्रामस्थ करणार हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगांव :** गावागावात हनुमानाचे मंदिर उभारण्यासाठी अनेक संत महंतांनी पुढाकार घेतला. गावाच्या रक्षणासाठी हनुमानाचे मंदिर उभारले गेले. परंतु आता जुन्या मंदिराचा जिर्णोद्धार व्हायला पाहिजे या उद्देशाने अनेक वर्षापासून राघवेश्वर देवस्थानचे महंत प्रयत्न करीत होते. अखेर ग्रामस्थांनी एकत्र येत महाराजांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने लोकवर्गणीतून भव्य दिव्य हनुमान मंदिर उभारण्याचा संकल्प केला आहे.



जुने असलेले मंदिर पूर्णपणे निर्लेखित करून मंदिरासाठी वापरलेली सागवानी खनाची लाकडे, लोखंडी ग्रील, विटा दगड व मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर असलेले पत्रे याचा जाहीर निलाव सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता ग्रामस्थांच्या उपस्थित मुर्शतपुर येथे हनुमान मंदिराच्या समोर होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करून गावच्या हिताचा निर्णय एकत्रितपणे घेण्यात आला.

महंत राघवेश्वरानंद गिरीजी महाराजांनी मंदिराच्या बांधकामासाठी ग्रामस्थांकडे लोकसभागाची जेव्हा मागणी केली तेंव्हा ग्रामस्थांनी देखील कुठल्याही प्रकारचे आढेवेढे न घेता भरभरून देणगी जाहीर केली. ५१ हजार रुपयांपासून तर ५ हजार रुपयापर्यंत अशा पद्धतीने जवळपास पाच ते सात लाख रुपयांची आकडे यावेळी जाहीर झाले. मंदिर बांधकामासाठी सिमेंट, वाळू व इतर काही गोष्टी देखील देणगी स्वरूपात देण्याचे अनेकांनी बोलून दाखवले. जुन्या मंदिराच्या सर्व साहित्यांचा लिलाव झाल्यानंतर मंदिराच्या बांधकामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# ग्रामसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव ग्रामपंचायत कार्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेत उपस्थित मान्यवरांनी अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या वेळी सरपंच मिलिंद कदम, ग्रामपंचायत अधिकारी कांबळे भाऊसाहेब , माजी सरपंच दत्तात्रय दांगडे ,रोहिदास दांगडे, रामदास दांगडे, नितीन राजू दांगडे, प्रविण कांबळे, अभिजित कदम, प्रमोद शिंदे, पोपट गलांडे, सुधीर पवार, शहाजी दांगडे, कुमार गलांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामसभेत उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून अजित पवार यांच्या सामाजिक, राजकीय व प्रशासकीय कार्याचा सविस्तर आढावा घेतला. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेले

**नावात बदल**

माझे जुने नाव सोनवणे (SONAWANE) केतन पाऊलस (PAULAS) असे असुन माझे नवे नाव केतन पावलस (PAVLAS) सोनवणे (SONAVANE) (माझे आधार कार्ड व पॅन कार्ड वरील नांव) वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असुन दुसरी अन्य नाही.

प्रतिज्ञापत्र

क्र.२५५२२४२०४१२६८१००६५३९२९

दि.०३/०२/२०२६

# कोपरगाव नगरपरिषदेची स्थायी समिती बैठक संपन्न अर्थसंकल्प लोकोपयोगी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव नगरपरिषदेच्या स्थायी समितीची महत्त्वपूर्ण बैठक नगराध्यक्ष पराग संधान यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीत नगरपरिषदेच्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी देण्यात आली. शहराच्या सर्वांगीण विकासास चालना देणारा, तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या गरजा केंद्रस्थानी ठेवणारा हा अर्थसंकल्प असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.



युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष पराग संधान यांनी विश्वासनाम्यात असलेल्या महत्त्वपूर्ण घोषणांना पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने ठोस धोरण या अर्थसंकल्पात स्वीकारण्यात आले आहे. विशेषतः शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, ज्येष्ठ नागरिक कल्याण आणि शहर सुशोभीकरण या क्षेत्रांमध्ये भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

नगरपालिका शाळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी पूर्वी असलेली ५० लाख रुपयांची तरतूद वाढवून थेट १ कोटी रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. शालेय इमारत दुरुस्ती, आवश्यक शैक्षणिक साहित्य व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष लक्ष देण्यात आले आहे.शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी सुशोभीकरणासाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने महिलांसाठी स्वतंत्र शौचालयांच्या उभारणीसाठीही १ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. अकस्मिक रोगराई व आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी ६० लाख रुपयांची तरतूद, तर ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी विविध योजनांसाठी १२ लाख रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत. स्वच्छता विभागासाठी वाहन खरेदी ८० लाख रुपयांची तरतूद करून शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.याशिवाय बगीच्यांची सुधारणा व नवीन उद्यानांच्या निर्मितीसाठी देखील या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे नागरिकांना विरंगुळ्याच्या व आरोग्यदायी वातावरणाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या बैठकीस मुख्याधिकारी सुहास जगताप, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, स्थायी समिती सदस्य विद्याताई सोनवणे, प्रसाद आढाव, आरोग्य सभापती वैभव आढाव, पाणीपुरवठा सभापती वैशालीताई वाजे, जनार्दन कदम, बांधकाम सभापती निलोफरभाभी पठाण, शिक्षण सभापती संजनाताई उदावंत तसेच महिला व बालकल्याण सभापती सविताताई मंजुळ आदी मान्यवर उपस्थित होते.

हा अर्थसंकल्प कोपरगाव शहराच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१४० २३० १८० | ५-८ | ४४० ५३० २३३ | जोड ४५-०२-३५ ८५-८६

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१४० २३० १८० | ५-६ | १५० १६९ ११४ | जोड ५२-१६-०३ ९७-६८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१२९ ४८० २०० | २-७ | १२४ ४६७ ११५ | जोड २१-६७-३४ ०९-७५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## दखल

### धनादेश न वटल्याने आरोपीस कारावास; १.७० लाखांचा दंड

**अहिल्यानगर :** नगर शहरातील कल्पतरू मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीला कर्जाच्या परताव्यापोटी दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नगर यांनी आरोपी धनोज दत्तात्रय शिंदे यांना दोषी ठरवून एक महिना कठोर कारावास व १ लाख ७० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंडाची रक्कम एका महिन्यात भरण्याचे आदेश देण्यात आले असून, दंड न भरल्यास आरोपीस आणखी तीन महिने कठोर कारावास भोगावा लागणार आहे. आरोपीने संबंधित पतसंस्थेकडून १ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाच्या परताव्यासाठी त्याने बंधन बँक, शाखा केडगाव, अहिल्यानगर येथील आपल्या खात्यावरून १ लाख ५७ हजार २८७ रुपयांचा धनादेश दिला होता. मात्र, हा धनादेश वटण्यासाठी सादर केला असता तो अनादरित झाला. त्यामुळे संस्थेने न्यायालयात तक्रार दाखल केली होती. प्रकरणात संस्थेच्या वतीने अशोक दत्तात्रय तांबे यांची साक्ष महत्त्वाची ठरली. दाखल कागदोपत्री पुरावे व फिर्यादींच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. फिर्यादी संस्थेसाठी ॲड. गणेश शेटे, ॲड. आशिष जाधव व ॲड. जैद शेख यांनी सहकार्य केले.



### शहरात प्रवेश करतानाच कचऱ्याने स्वागत; अहिल्यानगरची प्रतिमा मलीन

**अहिल्यानगर :** शहरात प्रवेश करताना चोहीबाजूंनी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगांमुळे शहराची प्रतिमा पूर्णतः मलीन होत असल्याचा गंभीर आरोप पर्यावरणवादी कार्यकर्ते तथा जागतिक पर्यावरण विकास सरकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गोरक्षनाथ गवते यांनी केला आहे. शहराच्या दर्शनी भागात असलेले हे कचऱ्याचे ढीग तात्काळ उचलण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील बुऱ्हाणनगर व भिंगार परिसरातून अहिल्यानगरकडे येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. त्याचप्रमाणे एमआयडीसीकडून शहरात येताना तसेच महामार्गाच्या कडेला देखील कचऱ्याचे ढीग दिसून येतात. परिणामी, शहरात प्रवेश करतानाच नागरिक व पाहुण्यांना घाणीचे दर्शन घडत असून, यामुळे अहिल्यानगरची स्वच्छ शहर म्हणून असलेली ओळख धोक्यात आली आहे. एकीकडे शहराला स्वच्छतेसाठी विविध पुरस्कार मिळत असताना, दुसरीकडे प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढिग दिसणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे गवते यांनी सांगितले. हा कचरा तात्काळ उचलण्यात न आल्यास १४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय व महापालिका कार्यालयाच्या प्रवेशद्वारात प्रतिकात्मक स्वरूपात कचरा टाकून आंदोलन केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# श्रीगोंद्यात घरगुती गॅसचा गैरवापर

## ३२ व्यावसायिकांना नोटिसा

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास व्यावसायिक वापर सुरू असल्याबाबत मराठी वृत्तपत्रांत सातत्याने बातम्या प्रसिद्ध होताच अखेर तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग खडबडून जागा झाला आहे. पुरवठा विभागाने ॲक्शन मोडमध्ये येत तब्बल ३२ व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा बजावल्या असून लवकरच त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत दिले आहेत.

**दै. राष्ट्र सह्याद्री इम्पॅक्ट**

श्रीगोंद्यात घरगुती सिलेंडरचा व्यासायिक वापर या मथळ्याखाली मराठी दैनिकातून वारंवार बातम्या प्रसारित होताच पुरवठा विभागाला खडबडून जग आली आहे पुरवठा विभागाने श्रीगोंदा शहर व तालुक्यातीलतब्बल ३२ व्यवसायिकांना नोटीस बजावली आहे त्यामध्ये हॉटेल, खानावळी, बेकरी, चहा सेंटर, स्नॅक्स सेंटर आदी आस्थापनांची तपासणी केली असता घरगुती सिलेंडरचा व्यवसायिक वापर होत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार खालील आस्थापनांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये हॉटेल नाथकृपा नाष्टा सेंटर, उपसरपंच बेकर्स, उपसरपंच चहा सेंटर, आनंद हॉटेल, शिवम हॉटेल, न्यू इंडियन बेकरी, हॉटेल विश्वजीत, पाहुणचार हॉटेल, जय मल्हार स्वामी कृपा मिसळ सेंटर, अन्नपूर्णा हॉटेल, व्यंकटेश हॉटेल, विश्वकर्मा चायनीज, खेडकर गुळाचा चहा, रायबा हॉटेल, ढोले बंधू मिठाईवाले, हॉटेल पाटील चायनीज, गुरुकृपा गुळाचा चहा, देवा चहा व वडापाव, हॉटेल गावरान तडका, सिद्धिविनायक स्नॅक्स, किसान दूध डेअरी, सरस्वती स्पॉट मॉल, अन्नपूर्णा खानावळ, हॉटेल जागरण गोंधळ, हॉटेल संध्याराणी, हॉटेल भानेश्वर स्वीट मॉल, हॉटेल पंचमी, ओनियन कॅफे हाऊस, पूर्वा मेस, द राउडी हॉटेल आणि हॉटेल शिवशाही याना नोटीस देण्यात आली आहे. वर्तमानपत्राने दाखवला आरसा अन् प्रशासन जागे आली असल्याचे नागरीकातून बोलले जात आहे दरम्यान, पत्रकारितेने प्रशासनाला जागं केल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असले तरी, ही कारवाई फक्त नोटिसांपुरती न राहता प्रत्यक्षात कडक अंमलबजावणी होणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे.



**कारवाई चालूच राहणार : कोरे**

**श्रीगोंदा तालुक्यात घरगुती सिलेंडरचा खुलेआम व्यावसायिक वापर होतोय त्यामुळे यापुढे कधीही अचानक कोठेही आणि कोणतेही दुकान तपासण्याबाबत भूमिका घेण्यात आली. दोषी सापडल्यावर पंचनामा करून त्याचेवर प्रचलित कायद्यानुसार फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. नागरिकांनी घरगुती सिलेंडरचा व्यवसायिक वापर करू नये, त्यास कायदेशीर बंदी आहे. असेही पुरवठा निरीक्षण अधिकारी कोरे यांनी सांगितले आहे.**

## कोकणगाव खुनातील मुख्य आरोपी मोकाटच

### ■ कारवाई नाही झाल्यास उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** तालुक्यातील कोकणगाव येथील खून प्रकरणात मुख्य आरोपी अजूनही मोकाट असल्यामुळे पोलिस व प्रशासनाच्या भूमिकेबाबत नातेवाईकांना गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यातील आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी त्यांनी तहसील कार्यालय प्रांगणात आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगाव या ठिकाणी १६ जानेवारी रोजी भाऊसाहेब नामदेव राजपूत यांची निर्घृण हत्या होऊनही जवळपास एक महिना होत आला आहे. तरीही या प्रकरणातील मुख्य आरोपी अजूनही मोकाट फिरत असल्याने पीडित कुटुंब दहशतीखाली जीवन जगत आहे. या खून प्रकरणात काही आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. त्यातील काहींना क्लीन चीट देण्यात आली तर काहींना ताब्यात घेण्यात आले.

त्यामुळे यामध्ये लक्ष्मी दर्शन झाल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. त्यामुळे पोलिसांची भूमिका शंकास्पद असल्याचे बोलले जात आहे. तथापि, मुख्य सूत्रधारांना अटक न करता सोडून देण्यात आल्याने न्यायप्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे. यानंतर पीडित कुटुंबावर रात्री-अपरात्री दबाव, धमकावणे व मानसिक त्रास वाढल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरोपी मोकाट असल्यामुळे आमच्या जीविताला व मालमत्तेला गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे सांगत कुटुंबीयांनी प्रशासनाकडे तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

याबाबत या प्रकरणातील फिर्यादी सूरज राजपूत व दया राजपूत यांनी तहसीलदार, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन मुख्य आरोपींना तात्काळ अटक करण्याची, तसेच कुटुंबाला पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. मात्र, निवेदन देऊनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. दरम्यान, जर तात्काळ कारवाई झाली नाही, तर दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर कुटुंबीय आमरण उपोषणाला बसणार असल्याचा थेट इशारा देण्यात आला आहे.एकीकडे खून प्रकरणात न्यायाची प्रतीक्षा आणि दुसरीकडे आरोपींची मोकळीक या विरोधाभासामुळे प्रशासनाची भूमिका आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

**आमच्या माणसाचा जीव गेलाय : रजपूत**

**तालुक्यातील कोकणगाव या ठिकाणी झालेल्या गंभीर हत्या प्रकरणात आमच्या माणसाचा जीव गेला आहे. पोलीस प्रशासन आणि राजकीय पुढारी हे प्रकरण वेगळ्या मार्गावर नेऊ पाहत आहेत. त्यामुळे प्रशासनाने याला आळा घालावा अशी मागणी पिढीतच्या कुटुंबाने केली आहे.**

## प्राचार्य डॉ. शिंदे यांची जनरल बॉडीवर निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** रयत शिक्षण संस्था साताऱ्याच्या जनरल बॉडी सदस्य पदी प्राचार्य डॉ. कुंडलिकराव शिंदे यांची निवड करण्यात आली.



रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या ता. १८ जानेवारी रोजी भरलेल्या बैठकीतील ठराव नं. २३ अन्वये आपणास संस्था घटना कलम ६ (ह) नुसार सेवानिवृत्त आजीव सभासद प्रवर्गातून जनरल बॉडीचे सभासद निवड झाली. संस्थेने पत्रव्यवहाराद्वारे त्यांना कळवले. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद या विचाराला कृतीत उतरवणा-या रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे यांची नुकतीच निवड झाली आहे. गेल्या तब्बल ४२ वर्षांपासून बहुजन समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या डॉ. शिंदे यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा हा सन्मान मानला जात आहे. संशोधन क्षेत्रातही डॉ. शिंदे यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच. डी. पदवी संपादन करून त्यांनी अर्थशास्त्र विषयात स्वतंत्र ओळख निर्माण केली. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर कार्यरत राहून अभ्यासक्रम रचना व मूल्यमापन प्रक्रियेतही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीवरील त्यांची निवड ही संस्थेसाठी अनुभवी, दूरदृष्टी असलेल्या शिक्षणतज्ज्ञाची भर मानली जात असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ संस्थेच्या भविष्यातील धोरणात्मक निर्णयांसाठी निश्चितच होणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.




छाया : दत्ता गाडगे

## प्रा.जयसिंग लंके व सोनाली चासकर राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** शिर्डीमध्ये नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य इंग्रजी माध्यम शाळा व संस्थापक संघटनेच्या ११ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात पारनेर तालुक्यातील वडझिरे गावातील पवनपुत्र एज्युकेशन सोसायटीचे, संस्थापक, प्रा. जयसिंग लंके आणि शिक्षिका सोनाली चासकर यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री ना. दादासाहेब भुसे आणि पालकमंत्री ना डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते ह पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि संस्थापक संघटनेच्या वतीने शिर्डी येथे ११ वे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच संपन्न झाले. यावेळी भव्य पुरस्कार वितरण सोहळा व शैक्षणिक प्रदर्शन २०२६, मोठ्या दिमाखात पार पडले.यावेळी वडझिरे येथील वडझिरे इंग्लिश मिडीयम स्कुल व संस्थापक प्रा. जयसिंग लंके यांच्या शैक्षणिक योगदानाची दखल घेवून प्राचार्य जयसिंग लंके यांना उत्कृष्ट संस्थापक पुरस्काराने गौरविण्यात आले. लंके यांनी संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीसाठी आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रमांसाठी दिलेल्या मोठया योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे. याच सोहळ्यात या शाळेतील गुणवंत शिक्षिका सोनाली चासकर यांना त्यांच्या अध्यापनातील गुणवत्ता, नाविन्यपूर्ण पद्धती आणि शाळेच्या निकालातील सातत्याबद्दल उत्कृष्ट शिक्षिका या पुरस्काराने गौरविण्यात आले.

हा सोहळा संस्थापक संघटनेचे, संस्थापक अध्यक्ष डॉ.संजय तायडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी नाशिक विभागातील माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती. या यशाबद्दल पारनेरसह अहमदनर व पुणे जिल्ह्यामधून तसेच संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक,पालक आणि विद्यार्थ्यांनी दोघांचेही मनपूर्वक अभिनंदन केले. हा सन्मान मी संस्था आणि गावाला समर्पित करत आहे. या पुरस्काराबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे वतीने जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे आणि वडझीरेचे माजी सरपंच बाळासाहेब दिघे, उद्योजक शंकर चौधरी आदिनी त्यांचा सन्मान केला.

## आरोप करणारेच खरे भ्रष्टाचारी : गवळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** मिरी ग्रामपंचायतचा कारभार स्वच्छ आणि पारदर्शक सुरू असून ग्रामपंचायत मध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही. मात्र माजी सरपंच भ्रष्टाचाराचे आरोप करून राजकीय स्टंट निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे मिरीच्या सरपंच अनिता जालिंदर गवळी यांनी भ्रष्टाचाराचे आरोप फेटाळून लावत मिरी ग्रामपंचायतच्या मागील दहा वर्षापासुनची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

**मिरी ग्रामपंचायतच्या १० वर्षाच्या चौकशीची मागणी**

यावेळी बोलताना सरपंच अनिल गवळी म्हणाल्या की मागील काही दिवसापूर्वीही माजी सरपंचांनी अशीच बेताल आरोप केले होते. त्यावेळी जामखेड व नेवासा येथील अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली होती. त्यामध्ये काहीही आढळले नाही. मात्र सध्या पुन्हा एकदा माजी सरपंच आरोप करून स्टंट करत आहेत. खरे पाहिले तर त्या माजी सरपंचाच्या कार्यकाळातच मोठ्या प्रमाणामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे.

आपल्याच हॉटेलच्या वेटरच्या नावावर लाखोची बिले कोणी काढली? कडगाव रस्त्याचे काम डांबरीकरण करत असताना दोन लाख रुपयांची मागणी कोणी केली? खासदार दिलीप गांधी यांनी दिलेला पाण्याचा टँकर कोणी विकला ? ग्रामनिधी व चौदावा वित्त आयोगाचे पैसे पेव्हींग ब्लॉक व बंदिस्त गटारात दाखवून पैसे कोणी खाल्ले ? गरीब पेंटरचे पैसे खाल्ले ? वयोवृद्ध महिलांना घरकुल देतो असे सांगुन पैसे कोणी घेतले ? जलजीवन च्या कामात अडथळे कोणी आणले ? बियर बार परमिट रूमचे लायसन कसे मिळवले? या सगळ्याच गोष्टीची चौकशी होणे गरजेचे आहे.

आरोप करणारे हेच चिखलात रुतलेले असून मी नाही त्यातली आणि कडी लावली असा प्रकार मिरीच्या माजी सरपंचाचा झाला असून आगामी जिल्हा परिषद , पंचायत समितीच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ते स्टंट करत आहेत. यामुळे गेल्या दहा वर्षापासून आत्तापर्यंतची संपूर्ण चौकशी करावी अन्यथा आम्हीही पोषण करणार असल्याचे सरपंच अनिता जालींदर गवळी यांनी सांगितले. यावेळी सुनंदा राहुल गवळी, अनिल विजय गुंड, संभाजी विक्रम झाडे आदि उपस्थित होते.

## सुसंस्कारित विद्यार्थी काळाची गरज : हर्षदा काकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** विद्यार्थी हा उद्या बंदिस्त जगातून खुल्या जगात जाणार आहे. उद्याचे जग हे तुमच्यासाठी खुले असणार आहे. त्यामुळे जगाच्या हजारो नजरा तुमच्याकडे असणार आहेत म्हणून विद्यार्थ्यांनी सुसंस्कारित होणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीचा निरोप समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकरराव गाडेकर हे होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक, विमलताई सातपुते,विद्यावर्धिनी मुळे, शरद सुपारे, किरण गोरे आदी मान्यवर उपस्थित होते. हर्षदाताई पुढे म्हणाल्या की, इयत्ता बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाने पुढील शिक्षणासाठी अनेक शाखा उपलब्ध आहेत. त्याची संधी प्रत्येकाने घ्यावी. असे आवाहन त्यांनी केले. तसेच बारावीच्या यशवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारासाठी आम्हाला पुन्हा संधी द्यावी असा मानस त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शंकरराव गाडेकर हे आपल्या मनोगतात म्हणाले की, विद्यार्थ्यांचे दिवसाचे ध्येय जसे निश्चित आहे तसेच त्यांनी जीवनाचे ध्येय देखील निश्चित करावे .

भविष्यात काय बनायचं हे अगोदरच ठरवावे. होवू घातलेल्या परीक्षेत कॉपी करू नका. वस्तूचा वापर कसा करतो यावरून वस्तूचे मूल्य ठरत असते. मोबाईलचा वापर अल्प प्रमाणात करावा असे आवाहन त्यांनी केले . शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा. किरण गोरे यांनी देखील आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांमधून पुनम गोरे, दिपाली शेलार, सायली मडके, रोहिणी नाचन, श्रेया सरसे आदींनी शाळा व शिक्षकांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यावेळी त्यांचा कंठ दाटून आला होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्या अंजली चिंतामण, अनुमोदन विद्यावर्धिनी मुळे, सूत्रसंचालन प्रा.दादासाहेब ज्योतीक यांनी केले.तर आभार सुदर्शन गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

**चापडगाव परिसरातील सतरा गावांना जायकवाडीचे पाणी मिळावे यासाठी पुर्नसर्वेक्षणाच्या अर्जावर पहिली सही करणारे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली वाहिली.**

# गोवंशहत्त्याबंदी कायद्याची कडक अंमलबजावणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात अवघ्या सात महिन्यांच्या कालावधीत बेकायदेशीर कत्तलखान्यांवर धडाकेबाज कारवाई करत सुमारे दीड कोटी रुपयांचे गोमांस जप्त करून हजारो गोवंशांचे प्राण वाचवणारे तसेच शेकडो गोमाफियांवर कारवाई करत त्यांना तडीपार करणारे कर्तव्यदक्ष व कार्यक्षम पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा जिल्ह्यातील गोरक्षकांकडून सन्मान करण्यात आला.

पोलीस अधीक्षक घार्गे यांनी जिल्ह्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर गोवंशहत्याबंदी कायद्याची अत्यंत कडक अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या या निर्भीड व कठोर भूमिकेचे कौतुक करत जिल्ह्यातील गोरक्षक दिनेश दोषी, शुभम शिंदे, शरद कोतकर, हर्षद पारखे, संदीप घेवारी, मयूर ससार आदींनी आज जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट देऊन त्यांचा तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचा सुंदर गाय-वासराच्या मूर्ती देऊन गौरव केला.

यावेळी गोरक्षक शिवशंकर स्वामी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, अशा कर्तव्यदक्ष आणि निःस्वार्थ पोलीस अधिकाऱ्यांमुळेच कायद्याचा दरारा निर्माण होतो व समाजाला न्याय मिळतो. या प्रसंगी स्थानिक गुन्हे शाखेतील सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये, पोलीस उपनिरीक्षक मनोज मेंढे, महादेव गुट्टे, अनंत सालगुडे, राजेंद्र वाघ तसेच पोलीस जवान ऱ्हदय घोडके, लक्ष्मण खोकले, भीमराज खर्से, दीपक घाटकर आदी उपस्थित होते.

**पोलीस अधीक्षक घार्गे यांचा सन्मान**



# बारामती दुध संघाचे नामांतर

## सहकारमहर्षी अजितदादा पवार सहकारी दूध संघ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती दुध संघाचे नामांतर सहकारमहर्षी अजितदादा पवार सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, बारामती.असे करण्यात आले आहे. संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये सदर निर्णय घेण्यात आला.

बारामती दूध संघाचे कामकाज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली होऊन संघाची नेहमीच उत्तरोउत्तर प्रगती झाली असून दादांचे यासाठी बहूमोल सहकार्य लाभले आहे. त्यामुळे अजितदादांची आठवण कायम स्मरणात राहावी याकरिता संचालक मंडळाच्या मिटींग नुसार (दि:३) रोजी नुसार बारामती दूध संघाचे नांव सहकारमहर्षी अजितदादा पवार सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, बारामती. असे करण्यात आले आहे. अशी माहिती संघाचे चेअरमन संजय रामचंद्र कोकरे व व्हा.चेअरमन, दत्तात्रय सदाशिव वावगे यांनी दिली. यावेळी संघाचे सर्व संचालक मंडळ, संघाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. योगेश राणे, उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा ) अमोल चव्हाण उपस्थित होते.



संघाचे पॅकींग दूध व दूग्धजन्य पदार्थ ‘‘नंदन‘‘ ब्रॅंडने विविध शहरांमध्ये विक्री होत असून सदरचे पाऊच पॅकींग दूध, पुणे, लोणावळा, अहिल्यानगर, संभाजीनगर, मुंबई, रोहा, महाड, सोलापूर या विविध शहरामध्ये विक्री होत आहे. तसेच पुणे व मुंबई येथील नामांकित हॉटेल्स्, कार्पोरेट ऑफिस, विविध नामांकित कंपन्या, हॉस्पीटल्स् इत्यादी ठिकाणी नंदन पाऊच पॅकींग दूध व दूग्धजन्य पदार्थाची विक्री केली जात आहे. संघामार्फत दूग्धजन्य पदार्थामध्ये सध्या श्रीखंड, आम्रखंड, पनीर, दही, ताक, लस्सी, तूप, बासुंदी, पेढा, कलाकंद, खवा इत्यादी दुग्धपदार्थाचे उत्पादन घेतले जात आहे. संघाच्या दूग्धपदार्थाला ग्राहकांची चांगली पसंती असून मोठयाप्रमाणावर मागणी आहे.

संघामार्फत सर्व प्राथमिक दूध संस्थांना मोफत पशुवैद्यकीय सेवा-सुविधा, आर्युवेदिक उपचार पध्दत, प्रशिक्षण, मुरघास प्रशिक्षण दिले जाते. तसेच दुध उत्पादकांना डेअरी साहित्य विभागामार्फत चाफकटर, मिल्कींग मशिन, मुरघास बॅग व मका बियाणे इत्यादीची अनुदानावर (स्वस्त दरात ) विकी केली जाते.

तसेच संघाच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी योग्य व वाजवी किंमतीत नंदन सुप्रिम, नंदन गोल्ड, नंदन गोल्ड प्लस, नंदन सिलव्हर, नंदन काफस्टार्टर, नंदन गर्भसत्व इत्यादी पशुखाद्य तसेच नंदन मिल्कमीन (मिनरल मिक्चर), इत्यादी प्रकारचे दर्जेदार उत्पादने विक्रीसाठी बाजारात आणली असून बारामती तालुक्यासह, दौंड, पुरंदर, खंडाळा, फलटण, माण, श्रीगोंदा, इंदापूर, करमाळा, टेंभूर्णी, सोलापूर इत्यादी ठिकाणी विक्री केली जाते. तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी नंदन पशुखाद्याच्या प्रत्येक पोत्यात वेळोवेळी आकर्षक भेटवस्तू मोफत देण्यात येत असते. त्याचा दूध उत्पादक शेतकऱ्यांना दैनंदिन वापरात चांगला उपयोग होत असतो.

# श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त महाप्रसादांच्या पंगतींना उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नगरीचे ग्रामदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त पाकशाळेतील उत्सवमूर्ती समोर परंपरेनुसार चालत आलेल्या महाप्रसादांच्या पंगतीना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नेवासा नगरीच्या मध्यावर श्री मोहिनीराजांचे मुख्य हेमाडपंथी मंदिर असून प्रवरानदी काठावर असलेल्या श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात उत्सवमूर्ती स्थापित करण्यात आली आहे.या उत्सवमूर्ती समोर सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत हजारो भाविक एकाच पंगतीत बसून



महाप्रसादाचा आस्वाद घेत आहे. सलग पाच दिवस चालणाऱ्या या महाप्रसादांच्या पंगतीमध्ये लहान थोर असा भेदभाव न करता सर्वजण एकत्रीत पंगतीमध्येच बसून प्रसादाचा लाभ घेतात.पारंपरिक पध्दतीने चालत परंपरेचे आज ही येथे पालन केले जाते.

विविध डाळींमध्ये शिजवलेले वाग्यांचे वरण,भात,गोड शिरा अशा प्रसादाचे सलग पाच दिवस पंगतीद्वरे वाटप केले जाते.येथे यात्रेनिमित्त होणाऱ्या या पंगती मागची आख्यायिका अशी की देव व दानवाच्या सागरमंथनातून चौदा रत्ने निघाली त्यामध्ये अमृत कलशाचा समावेश होता हे अमृत देवांनाच मिळावे म्हणून भगवान श्री विष्णूंनी सुंदर मोहिनी घालणाऱ्या स्त्री(ललनेचे)रूप घेऊन येथे पंगतीद्वरे देवांना अमृताचे तर दानवांना मदीरेचे वाटप केले

सुंदर ललनेच्या झालेल्या या अवताराला मोहिनीराज असे नाव पडले अशी पुराण कथेत उल्लेख असल्याचे सांगितले जाते म्हणून या नेवासे क्षेत्री पंगतीचे महत्व यात्रा काळात आहे. या महाप्रसादाच्या पंगती यशस्वी करण्यासाठी नेवासा येथील शालेय विद्यार्थ्यांसह तरुण मंडळाची कार्यकर्ते प्रसाद वाढण्याचे काम करतात,तसेच श्री मोहिनीराज देवस्थानचे विश्वस्त मंडळ व यात्रा कमिटीचे सदस्य याकामी योगदान देण्याचे काम करत आहे

# धानोरे ग्रामस्थांकडून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या विमान अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या अचानक जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांपासून कार्यकर्त्यांपर्यंत व्यक्त होत आहे. त्यांच्या लोकहितकारी कार्याची आठवण म्हणून धोनोरे गावातील ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण शोकसभा आयोजित करण्यात आली.

या शोकसभेत प्रा.डॉ.हेमकांत गावडे, आदर्श शिक्षक पांडुरंग गावडे, माजी केंद्रप्रमुख उल्हास रोकडे, ॲड.संदीप मच्छिंद्र गावडे, कामगार नेते धिरज साबळे, भानुदास गावडे, युवासेना उपजिल्हा प्रमुख सचिन गावडे, रोहिदास गावडे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ॲड. संदीप गावडे यांनी स्व.अजितदादा हे सर्वसामान्यांचा नेता असून गोरगरिबांच्या प्रश्नांसाठी ते सदैव झटत राहिले. कठोर निर्णय घेण्याची क्षमता आणि प्रशासकीय कौशल्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले, अशा शब्दांत त्यांनी आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना सुनील बाबासाहेब गावडे यांनी केली तर आभार प्रदर्शन खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक पांडुरंग गावडे यांनी केले. या शोकसभेस सरपंच संतोष गावडे यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि धोनोरे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व.अजितदादा यांचे विचार आणि कार्य सदैव प्रेरणादायी राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# खामुंडीच्या पाझर तलावात आढळले मृत सांबर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** खामुंडी (ता. जुन्नर) गावाच्या हद्दीतील बदगी रोडवरील कोरड्या पाझर तलावात एक सांबर मृत अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. ही घटना ग्रामस्थांच्या निदर्शनास येताच तत्कालीन वनपाल सुधाकर गिते त्यांनी तत्काळ ओतूर वन विभागास याची माहिती दिली.

माहिती मिळताच ओतूर वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे, वनपाल सारिका बुट्टे, सचिन मोढवे, वनरक्षक विश्वनाथ बेले, किसन बोडके, रोशन नवले, धनंजय केदार, अमर भुतांबरे, रोहित शिरसाठ आदी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यात पाण्याच्या शोधात आलेल्या सांबराचा शेजारच्या उंच कड्यावरून पाय घसरून खोल कोरड्या पाझर तलावात पडल्या ने त्याचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. हा तलाव सध्या पूर्णतः कोरडा असून, बाजूच्या परिसरातच वन्यप्राण्यांसाठी वनविभागाने पाणवठा केलेला आहे. वनविभागाने मृत सांबराची प्रक्रिया पूर्ण करून नियमानुसार त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# जि.प. व पंचायत समिती निवडणूकीसाठी २३ हजार मनुष्यबळाची नियुक्ती : जितेंद्र डुडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या कामकाजाकरिता जिल्ह्यात १३ तालुक्यात एकूण २३ हजार ११४ मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

बारामती तालुक्यात १ हजार ९४५, मावळ १ हजार ६१२, मुळशी १ हजार ४९५, शिरुर २ हजार १९०, हवेली १ हजार ८००, दौंड २ हजार ६० , इंदापूर २ हजार ६३२ , पुरंदर १ हजार ५३८, भोर १ हजार १९०, वेल्हे ४५०, आंबेगाव १ हजार ५७५, जुन्नर २ हजार ४११ आणि खेड २ हजार २१६ तालुक्यात असे एकूण २३ हजार ११४ मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे.

जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्रबारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात असे एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र आहेत.

निवडणुकीच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीवर कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून नागरिकांनी ०२०-२६१२३३७१ हेल्पलाईन क्रमांक तसेच १०७७ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन डुडी यांनी केले आहे.

# संयोग निवासस्थानी सांत्वन भेटी कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :( दि:३)**

उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार रविवारी (दि. १) रोजी प्रथमच शहरातील सहयोग सोसायटी येथील निवस्थानी दाखल झाल्या, यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला श्रद्धांजली वाहण्यासाठी व सुनेत्रा पवार तसेच पवार कुटुंबीयांना भेटण्यासाठी सांत्वन भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी बारामती पंचक्रोशीतील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मागील सहा दिवस पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगरच कोसळला असताना त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी हे दुःख पचवत व



जबाबदारी पार पाडत शनिवारी ३१ रोजी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार बारामती दाखल झाल्या त्यांच्यासोबत पार्थ आणि जय पवार उपस्थित होते. दरम्यान काल सांत्वन भेट आयोजित करण्यात आली होती.

# निवडणूक काळात हत्यारांसह तरुण जेरबंद दुचाकी, दोन तलवारी व कोयता जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :**जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या कडेकोट पोलिस बंदोबस्तात बारामती तालुका पोलिसांनी कारवाई करत एका तरुणाला तलवार व कोयत्यासारखी धारदार हत्यारे बाळगताना रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर रूई ब्रिज परिसरात करण्यात आली.

(दि.२) फेब्रुवारी रोजी बारामती तालुका पोलीस निवडणुकीच्या अनुषंगाने पेट्रोलिंग सुरू असताना एका बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली. एका होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून एक इसम तलवार व कोयता बाळगून एमआयडीसीकडून भवानी नगरच्या दिशेने जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने सापळा रचला. रूई ब्रिजखाली



संशयित दुचाकी अडवून तपास केला असता ओंकार रामचंद्र काळे (वय १९ रा. सणसर ता. इंदापूर जि.पुणे) असे आरोपीचे नाव निष्पन्न झाले. त्याच्या दुचाकीच्या डाव्या बाजूला असलेल्या पांढऱ्या रंगाच्या पिशवीतून दोन लोखंडी तलवारी व एक धारदार कोयता मिळून आला. पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी झडती घेऊन ही सर्व हत्यारे तसेच दुचाकी जप्त केली. यात होंडा युनिकॉर्न दुचाकी (एम.एच. ४२ बी.जी ७३७७) अंदाजे किंमत ३०,००० रु.,पितळी मुठ असलेली तलवार (६७ सेमी) अंदाजे किंमत १,५०० रु, लोखंडी तलवार (४५ सेमी) अंदाजे किंमत ५०० रु, लोखंडी धारदार कोयता अंदाजे किंमत ३०० रु. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ३२,३०० रु इतकी आहे.

बेकायदेशीर रीत्या हत्यारे बाळगल्याप्रकरणी आरोपी ओंकार काळे याच्याविरोधात भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुका पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव तसेच अमोल कदम पोलीस उपनिरीक्षक बारामती तालुका आणि पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ मनोज पवार अवधूत शिंदे भारत खारतोडे दादा दराडे यांनी केली आहे.

'कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा कुणीही प्रयत्न करू नये. बेकायदेशीर हत्यारे बाळगणे, दहशत निर्माण करणे, धमकावणे किंवा संशयास्पद हालचाली करताना कोणीही आढळून आल्यास संबंधित व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सुदर्शन राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी**

कोणताही अनुचित प्रकार आढळून आल्यास किंवा अशा प्रकारांची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ बारामती तालुका पोलिसांशी संपर्क साधावा. कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई होणारच.'

**चंद्रशेखर यादव, पोलीस निरीक्षक**

'निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कुणीही कायदा हातात घेऊ नये, गुन्हेगारांच्या प्रत्येक हालचालीवर बारामती पोलिसांचे लक्ष आहे. असे काही अनुचित प्रकार करण्याचा कुणी प्रयत्न केला तर अशांवर कठोर कारवाई केली जाईल, कुणाचीही गय केली जाणार नाही.'

**गणेश बिरादार, अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग**

द•ख•ल

# कॉण्ट्रॅट सोडण्यासाठी जीवे मारण्याची धमकी

**अहिल्यानगर:** व्यवसायातील स्पर्धेतून एका तरुणाला ॲट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची आणि हातपाय तोडण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना वाटेफळ येथे घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सय्यद रशिद बबन (वय ३८, रा. वाटेफळ) हे शेती व व्यावसायिक कामे करतात. त्यांनी घेतलेले एक कामाचे कॉन्ट्रॅट आरोपी गणेश सकट (रा. तुक्कडओढा) याला हवे होते. याच कारणावरून आरोपीने फिर्यादीला रस्त्यात गाठून हातपाय तोडण्याची धमकीही त्याने दिली.या घटनेनंतर फिर्यादी यांचा मुलगा बेपत्ता झाल्याने ते त्याच्या शोधार्थ दोन दिवस व्यस्त होते. त्यामुळे तक्रार देण्यास विलंब झाला. अखेर त्यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन आपबिती सांगितली. पोलिसांनी या प्रकरणी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली.

# पुणे ग्रामीण जिल्ह्यात १९ फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

**नाझरे सुपे** - पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री १२.०५ वाजल्यापासून ते १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, शस्त्रे अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाच्या चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ्याने अर्वाच्च घोषणा देणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यास देखील प्रतिबंध करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# महामंडळाच्या संकेतस्थळावर ‘बिझीनेस प्रोमोशन’ टॅब उपलब्ध

**नाझरे सुपे** : - अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या या संकेतस्थळावर व्यवसाय वृद्धी (बिझीनेस प्रोमोशन) स्वतंत्र टॅब उपलब्ध करून देण्यात आला आहे. लाभार्थ्यांनी या सुविधांचा लाभ घेऊन आपली आवश्यक माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे. या सुविधे अंतर्गत लाभार्थ्यांना आपली सेवा, उत्पादने, त्यांची किंमत तसेच वैशिष्ट्यासह व्यवसायाशी संबंधित सविस्तर माहिती पोर्टलवर अपलोड करता येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना व्यवसायाचे नाव, व्यवसायाचा प्रकार, उत्पादने अथवा सेवा, किमती, वैशिष्टे, संपर्क तपशील व इतर आवश्यक माहिती संकेतस्थळावर नोंदविता येणार आहे. या सुविधामुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायाला व्यापक प्रचार व प्रसिद्धी मिळणार असून त्यांची उत्पादने व सेवा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायाचा विस्तार होण्यास चालना मिळेल, तसेच लाभार्थ्यांना आर्थिकदृष्टया अधिक सक्षम होण्यास मदत होईल.

# माध्यम समन्वयकांनी चोख जबाबदारी पार पाडावी : युवराज पाटील

**नाझरे सुपे :-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकाच्यादरम्यान मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेत ‘माध्यम समन्वयकाची भूमिका’ या विषयावर जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती सदस्य युवराज पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त नियुक्त माध्यम समन्वयकांसोबत दूरदृष्यप्रणालीद्वरे संवाद साधला.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि न्याय वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने माध्यम समन्वयकाची भुमिका महत्वपूर्ण; त्यामुळे माध्यम समन्वयकांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात, अशी सूचना श्री. पाटील यांनी केली.

यावेळी श्री. पाटील यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकाच्यादरम्यान प्रसारमाध्यमांसाठी असलेल्या सुविधा, माध्यम कक्षाचे कामकाज, प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान व मतमोजणीच्या दिवशी देण्यात येणारी प्रवेशिका, प्रसार माध्यमांना वेळोवळी निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणे, मतदान व मत मोजणी केंद्रावरील घ्यावयाची दक्षता, उमेदवारांच्या जाहिरातीचे प्रमाणीकरण व संनियंत्रण, पेडन्यूज आदी विषयांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित माध्यम समन्वयकांच्यावतीने उपस्थित करण्यात आलेल्या शंकाचे निरसन करण्यात आले.

# पुरंदरला राज्यस्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

**नाझरे सुपे :** समाज कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शासकीय निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन २ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, दिवे (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धांचे उद्घाटन आयुक्त, समाज कल्याण, दीपा मुधोळ मुंडे, यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सह आयुक्त (शिक्षण) प्रमोद जाधव, उपसंचालक (शिक्षण) निशादेवी बंडगर वंदना कोचुरे, तसेच विविध विभागांतील सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, विभागातील अधिकारी-कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

योवळी विविध विभागांतील सहभागी विद्यार्थिनींचे भव्य पथसंचलन झाले. या राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण २९४ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला आहे.

अध्यक्षीय भाषणात आयुक्त दीपा मुधोळ मुंडे यांनी विद्यार्थिनींना स्पर्धेसाठी शुभेच्छा देत खेळामध्ये खिलाडूवृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी केले. प्रमोद जाधव, सह आयुक्त (शिक्षण) यांनीही विद्यार्थिनींना शुभेच्छा दिला. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे यांनी केले.

या स्पर्धांमध्ये फुटबॉल, १००, २०० व ४०० मीटर धावणे, ४÷१०० मीटर रिले, लांब उडी, थाळीफेक, खो-खो, तसेच भूमिका अभिनय व लोकनृत्य अशा विविध क्रीडा व सांस्कृतिक प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धांसाठी पुणे जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील क्रीडा शिक्षक पंच म्हणून काम पाहत आहेत.

# द•ख•ल

## श्री गोरक्षनाथ गड देवस्थान कलशरोहण कार्यक्रमानिमित्त नियोजन बैठक



**नगर :** आदर्श गाव म्हणून ओळखले जाणारे मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड देवस्थान मंदिराच्या कलशरोहण व लोकअर्पण सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. या भव्य धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नियोजन बैठक रविवारी, ८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता देवस्थान परिसरात आयोजित करण्यात आली आहे. कलशारोहण सोहळ्याच्या निमित्ताने परिसरातील गावांमध्ये तीन ते चार दिवस कलशाची धार्मिक मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत नाथसंप्रदायाचे अनुयायी, वारकरी, स्थानिक भक्त, तसेच गावातील महिलांचा सहभाग असणार आहे. पारंपरिक टाळ-मृदुंग, भजन-कीर्तन, आणि गजरांनी वातावरण भक्तिमय होईल, अशी माहिती देवस्थानकडून देण्यात आली आहे.

कलशरोहण सोहळ्यापूर्वी तीन दिवसांचे हरिनाम सप्ताह, प्रवचन व कीर्तन कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## गीत गायन स्पर्धेत दुर्वा अकोलकरचे यश

**करंजी :** वैयक्तीक गीत गायन स्पर्धेमध्ये दूर्वा अकोलकर हिने तालुका स्तरावर यश मिळवले असून आता तिची जिल्हास्तरावर निवड झाली आहे.



पाथर्डी तालुक्यातील विविध केंद्रात प्रथम क्रमांकप्राप्त सर्व स्पर्धक विद्यार्थी तालुकास्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते.

पाथर्डी तालुकास्तरीय वैयक्तिक गीतगायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या दुर्वा अकोलकर हिची जिल्हास्तरीय सर्धेसाठी निवड झाली आहे.या स्पर्धेत तीने स्वतः हार्मोनियम वाजवत उत्कृष्ठ गीताचे गायन करत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

दुर्वा अकोलकर ही जि.प. प्राथमिक शाळा थोरलामळा येथे तिसरीच्या वर्गात शिकते. तिला अविनाश अकोलकर यांनी तबल्याची व आलिया पठाण हिची साथ लाभली तर मुख्याध्यापिका उषा ढोले,शिक्षक मुकुंद दुबे,प्रविण शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले.

## कार्यारंभ आदेश मिळूनही रस्ता रखडला

**करंजी:** ससेवाडी ते कोल्हार उदलमल या घाट रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मंजुरी मिळून आणि कार्यारंभ आदेश देऊन दोन वर्षांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्यापही या कामाला मुहूर्त मिळालेला नाही. प्रशासनाच्या या वेळकाढू धोरणामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आता आंदोलनाचे हत्यार उपसले असून, येत्या ८ दिवसांत काम सुरू न झाल्यास 'रस्ता रोको' करण्याचा इशारा माजी सभापती संभाजी पालवे यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

ससेवाडी-कोल्हार उदलमल हा रस्ता (प्रजिमा ४९) या भागातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यासाठी सन २०२३-२४ मध्ये २ कोटी २४ लाख ९८ हजार ३६६ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन दोन वर्षांपूर्वीच या कामाचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात कामच सुरू झाले नाही.या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नगर पाथर्डी नेवासा शेवगाव तालुक्यातील नागरिकांना, शेतकऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घाटातील रस्ता खराब असल्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. ''निधी मंजूर असताना आणि आदेश निघालेले असताना काम का थांबले आहे?'' असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

प्रशासनाने वारंवार आश्वासन देऊनही कामाला सुरुवात केलेली नाही. जर पुढील ८ दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नाही, तर चिचोंडी शिराळ पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडले जाईल. असा इशारा माजी सभापती संभाजी पालवे, बाबाजी पालवे, किशोर पालवे, दिलीप गीते,मार्केट कमिटीचे संचालक वैभव खलाटे, सामाजिक कार्यकर्ते एकनाथ अटकर,अशोक कुटे,सरपंच अशोकराव दहातोंडे, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष अंबादास डमाळे, सरपंच भीमराज सोनवणे यांच्या सह्या निवेदनात आहेत.

# दिवंगत अजित पवारांचे श्रद्धांजली फलक काढले

## नगरपंचायतीचा निषेध व्यक्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** शहरात विविध ठिकाणी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे श्रद्धांजली फलक राजकीय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी लावले असताना कर्जत नगरपंचायतीने मंगळवारी ते फलक राजकीय सूडबुद्धीने काढले.

सदरच्या घटनेचा आम्ही कर्जतकर म्हणून निषेध करीत असल्याची प्रतिक्रिया युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष धुमाळ यांनी दिली. कर्जत शहरात असे विना परवानगी अनेक फलक असून राज्याची मोठी हानी झालेल्या व्यक्तीमत्वाचे श्रद्धांजली फलकच नगरपंचायतीस खुपले नाही का ? असा प्रश्न देखील उभा करीत कर्जत नगरपंचायतीचा निषेध नोंदविला.

मागील आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. अखंड महाराष्ट्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने शोकसागरात बुडाला असून सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या भावना अनावर झाल्या आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे श्रद्धांजली वाहणारे फलक कर्जत शहरासह तालुक्यात तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात लागले आहे.

मात्र कर्जत शहरातील श्रद्धांजली फलक कर्जत नगरपंचायतीने काढण्याचा सपाटा मंगळवारी दुपारीपासून सुरू केला. कर्जत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व विद्यमान पदाधिकारी यांनी केवळ राजकीत सूडबुद्धी दाखवतात जाणून-बुजून अजित पवार यांचे फलक काढून ते ट्रॅक्टरमध्ये आडवे-तिडवे टाकत स्वर्गीय अजित पवार यांच्या फोटोची विटंबना केलेली आहे. ही गोष्ट निषेधार्थ असून कर्जत शहरात अनेक ठिकाणी वेगवेगळे फलक आजमितीस तसेच उभे आहे केवळ श्रद्धांजलीचे फलकच या नगरपंचायतीला सहन होत नव्हते का ? असा प्रश्न उभा राहिला आहे.

महाराष्ट्रात ठिकठिकाणी असे फलक लावले असताना कर्जतमध्येच ही कार्यवाही का ? असा सवाल पप्पू धुमाळ यांनी प्रशासनास विचारला. प्रशासनाने यावर योग्य ती पावले उचलत काढलेले सर्व फलक पुन्हा त्याच जागी लावावी. अन्यथा पुढील काही दिवसात याबाबत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धुमाळ यांनी दिला आहे.

याबाबत कर्जत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अक्षय जायभाये आणि नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

**कर्मचाऱ्यांकडून अनावधानाने फलक काढण्यात आले**

कर्जत शहरात काही विना परवानगी फलक लागले होते ते काढण्याची प्रक्रिया कर्जत नगरपंचायतीच्याडरे सुरू होती. त्यात अनावधानाने कर्मचाऱ्यांकडून राज्याचे लोकनेते दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काही श्रद्धांजली फलक देखील काढले गेले. सदरची बाब लक्षात येताच त्यांचे पुढील काही फलक काढण्यात आले नाही. तसेच काढलेले फलक देखील लावण्यास सांगितले आहे. यात कोणाच्या भावना दुखविण्याचा हेतू नव्हता.

**अक्षय जायभाये,**
**मुख्याधिकारी**




## लोकसंस्कृतीच्या संवर्धनाची धुरा डॉ. महावीरसिंग चौहान यांच्याकडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्याच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी सुप्रसिद्ध गीतकार, कवी, शाहीर व प्राध्यापक डॉ. महावीरसिंग चौहान गोंडगावकर यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष संदीप कुमार जगदीश बोरकर यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रान्वये ही निवड जाहीर करण्यात आली.



या निवडीमुळे शेवगाव तालुक्यासह परिसरातील लोकसंस्कृती, पारंपरिक कला व लोककलावंतांच्या प्रश्नांना बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. निवडीनंतर बोलताना डॉ. चौहान यांनी सांगितले की, पिंगळे, गोंधळी, पोतराज, भराडी, शाहीर, भारुडकार, नकलाकार आदी अनेक लोककलावंत आज उपेक्षित अवस्थेत आहेत. त्यांच्या कलेला न्याय, सन्मान व आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले जातील.

दिव्यांग, निराधार व गोरगरीब लोककलावंतांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या हक्कांसाठी शासनदरबारी पाठपुरावा करणे हे प्रमुख उद्दिष्ट राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या निवडीबद्दल शेवगाव तालुका व अहिल्यानगर जिल्ह्यातील साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शेवगाव पत्रकार संघानेही त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

## तमाशा-वगनाट्याचे जिवंत दैवत

### रघुवीर खेडकर यांना पद्मश्री ; पत्रकार संघाकडून गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** महाराष्ट्राच्या लोककला परंपरेत सुवर्णाक्षरांनी नोंद होईल अशी ऐतिहासिक घटना घडली असून, तमाशा व वगनाट्य या पारंपरिक लोककलेचे ज्येष्ठ व लोकप्रिय कलावंत रघुवीर तुकाराम खेडकर यांना भारत सरकारकडून सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तमाशा कलेसाठी मिळालेला हा पहिलाच पद्म पुरस्कार असल्याने संपूर्ण लोककला क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण आहे.

गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ रघुवीर खेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य तमाशा कलेसाठी समर्पित केले. ग्रामीण महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या या कलेला जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी



अखंड परिश्रम घेतले. गावोगावच्या फडांपासून ते राज्य व राष्ट्रीय पातळीवरील मंचांपर्यंत त्यांनी सुमारे १२ हजारांहून अधिक प्रयोग सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून समाजजीवन, शेतकरी, कष्टकरी, स्त्रीजीवन, संघर्ष व सामाजिक वास्तव यांचे प्रभावी दर्शन घडते.

या सन्मानाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील पाबळ येथे खेडकर यांचा गौरव सोहळा पार पडला. यावेळी मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे म्हणाले, तमाशा व वगनाट्याची जिवंत परंपरा जपणारे रघुवीर खेडकर यांना पद्मश्री जाहीर होणे ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. र्यक्रमास पत्रकार, कलाप्रेमी व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रघुवीर खेडकर यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा संपूर्ण तमाशा परंपरेचा सन्मान असून, नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेचा अमानुष छळ

### पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, या प्रकरणी पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहानंतर अवघ्या काही दिवसांतच छळ सुरू झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादी महिलेचा विवाह दि. २८ एप्रिल २०२५ रोजी प्रतिक हेमंत बेंद्रे (रा. देशमुख वस्ती, आंबळे, ता. शिरूर, जि. पुणे) याच्याशी अहिल्यानगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात रजिस्टर पद्धतीने झाला होता. त्यानंतर हॉटेल रेडियन्स येथे मोठ्या थाटामाटात विवाह सोहळा पार पडला.

विवाहावेळी फिर्यादीच्या वडिलांनी संसारोपयोगी साहित्य, दागिने, मंगळसूत्र, कर्णफुले, पैजन, तसेच पतीस रोख एक लाख रुपये व सोन्याची अंगठी दिली होती. विवाहासाठी सुमारे १५ ते २० लाख रुपयांचा खर्च केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.



विवाहानंतर सुरुवातीचे चार ते पाच दिवस सासरी चांगली वागणूक देण्यात आली. मात्र त्यानंतर सासू अनुपमा बेंद्रे व नणंद सुप्रिया चौधरी यांनी माहेरकडून कमी सोने दिले असे टोमणे मारत १५ तोळे सोने आणण्याची मागणी सुरू केली. जाव प्रियंका बेंद्रे हिने घरातील सर्व कामे व शेतातील कामे जबरदस्तीने करून घेतल्याचा आरोप आहे. काम न केल्यास उपाशी ठेवणे, आजारी असतानाही उपचार न करणे, असा अमानुष छळ करण्यात आल्याचे फिर्यादीने सांगितले.

तक्रारीत मानलेले मामे सासरे प्रशांत घोरपडे यांच्याकडून लैंगिक छळ झाल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अंघोळीच्या वेळी जवळ बोलावणे, शरीराला स्पर्श करणे, हात पकडणे व अश्लील वर्तन केल्याचे नमूद आहे. तसेच भाऊ पवन बेंद्रे यानेही अश्लील नजर टाकणे, अंगावर हात फिरवणे व विरोध केल्यास मारहाण केल्याचा आरोप आहे. या सर्व प्रकारांची तक्रार पतीकडे करूनही त्याने संरक्षण देण्याऐवजी छळात साथ दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी १५ तोळे सोने व १० लाख रुपये आणले नाहीत तर विहिरीत ढकलून आत्महत्येचा बनाव करू, अशी जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. यावेळी पोलीस हेल्पलाईन ११२ वर संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत फिर्यादीला सुरक्षित केले.

या प्रकरणी पती प्रतिक बेंद्रे, सासू अनुपमा बेंद्रे, भाऊ पवन बेंद्रे, जाव प्रियंका बेंद्रे, नणंद सुप्रिया चौधरी, मानलेले मामे सासरे प्रशांत घोरपडे व अरविंद घोरपडे यांच्याविरुद्ध हुंडाबळी प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार, शारीरिक व मानसिक छळ तसेच लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

## स्टेट बँकेतून पैसे काढताच पाळत; स्कुटीची डिक्की फोडून रोकड लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :**

शहरात कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी धक्कादायक घटना उघडकीस आली असून, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून काढलेले तब्बल पाच लाख रुपये भरदिवसा चोरीला गेल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

शेवगाव येथील बाबुराव भाऊराव कमानदार (वय ६०, यांनी जागा खरेदीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, शेवगाव शाखेतून पाच लाख रुपये रोख काढले होते. ही रक्कम व बँकेचे चेकबुक त्यांनी त्यांच्या एम.एच. १६ सी. एक्स. १९६१ क्रमांकाच्या स्कुटीच्या डिक्कीमध्ये ठेवली होती.

दिनांक २ फेब्रुवारी रोजी ११.१५ गाडी गेटसमोर लाऊन संबंधित विभागाच्या कार्यालयात गेले असता दुपारी १२.३५ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी शहरातील आय.टी.आय. परिसरात स्कुटीची सीट तोडून डिक्की फोडली व त्यातील पाच लाख रुपये रोख तसेच चेकबुक चोरून नेले. संबंधित चोर सीसीटीव्ही मध्ये स्पष्टपणे दिसत आहेत. वर्दळीच्या परिसरात भरदिवसा ही चोरी झाल्याने नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेची भावना पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच पीडित शेतकऱ्याने शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मात्र, अद्यापही चोरट्यांचा ठोस माग काढण्यात पोलिसांना यश आलेले नाही. यापूर्वीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात चारचाकी वाहनाची काच फोडून मोठी रक्कम लंपास करण्याची घटना घडली होती, त्या प्रकरणाचाही तपास प्रलंबित आहे.

दरम्यान, शहरात मोठ्या खर्चातून बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा प्रभावी वापर करून तपास वेगाने करावा, तसेच बँक परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था लागू करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वैश्या व्यवसायाला लोकप्रतिनिधींचा आशीर्वाद : अरविंद कापसे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील शहरी भागासह ग्रामीण भागात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात फोफावले आहेत. यामागे पोलिसांची हप्तेखोरी आणि लोकप्रतिनिधींचा आशीर्वाद असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष अरविंद कापसे यांनी केला आहे.

आज दि ३ फेब्रुवारी रोजी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविद कापसे यांनी श्रीगोंदा शहरातील एका हॉटेलमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलताना म्हणाले, श्रीगोंदा तालुक्यातील वाढते अवैध धंदे तसेच खुलेआम चालू असलेला नशेचा बाजार तसेच वेश्या व्यवसायाच्या माध्यमातून वायाला चाललेली तरुणाई यामुळे तालुक्यातील अनेक पिढ्या बरबाद झाल्याशिवाय राहणार नाही ही धोक्याची घंटा असून यास तालुक्यातील लोकप्रतिनिधीच जबाबदार असल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. शिंदे नावाचा इसम काळ्या स्कॉर्पिओ मधून महिलांचा तालुक्यातील विविध भागात पुरवठा होतो.

ते पुढे बोलताना म्हणाले, माझ्यावर एका वेश्या व्यवसाय करणाऱ्या



नराधमाने ५० हजार रुपये खंडणी मागितल्याचा आरोप केला. तो तथ्याहीन असून त्यांनी त्याचे पुरावे द्यावेत. आरोप केलेल्या माणसावर २०२४ मध्ये पोलीस कारवाई झाली होती. त्यावेळी त्यासाठी आम्हीच पाठपुरावा केला होता पेडगाव रोड परिसरात असलेल्या असलेल्या अवैध व्यवसायामुळे परिसरातील महिला मुली भयभीत झालेल्या आहेत.

त्यामुळे पोलिसांनी सदर ठिकाणी कारवाई करून तालुक्यातील अवैध धंदे बंद करावेत अन्यथा संभाजी ब्रिग्रेड स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे या पत्रकार परिषदेसाठी संभाजी ब्रिग्रेडचे जिल्ह्याध्यक्ष अरविंद कापसे,नाना शिंदे, सुनील ढवळे आदी मान्यवर उपस्थित होते.

गाडीवर आजी-माजी आमदाराचा फोटो : कापसे श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी यासह विविध वैश्या अड्ड्यावर एका काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ मधून महिलांचे हस्तांतरण होते त्या गाडीवर आजी माजी आमदाराचे पुढे आणि मागे फोटो चिकटवलेले आहेत. त्यामुळे सदर व्यवसायात आजी माजी आमदाराचा समावेश असल्याचा आरोप संभाजी ब्रिग्रेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे यांनी केला आहे.

सोशल मीडियावर धंदा तेजीत : कापसे श्रीगोंदा तालुक्यातील वैश्या व्यवसायाची केंद्रस्थाने असलेल्या काष्टी श्रीगोंदा मांडवगण परिसरात या व्यवसायिकांकडून या गोरख धंद्यासाठी तसेच तरुणाईला जाळ्यात ओढण्यासाठी मोठ्या प्रमाणात सोशल मीडियाचे ग्रुप तयार करून त्यावरती फोटोग्राफ पाठवले जातात. अशी माहिती कापसे यांनीं पत्रकार परिषदेत बोलताना दिली आहे.

## बालमटाकळी जि. प. शाळेचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** बालमटाकळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्यात आपली छाप पाडली आहे. जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला वसलेल्या या केंद्रशाळेने मर्यादित साधनसामग्रीतून मोठे यश संपादन केले आहे.

शाळेसाठी स्वतंत्र मैदान नसतानाही मातीच्या मोकळ्या जागेत आखणी करून, पाणी मारून व स्वच्छता राखत शिक्षकांनी स्वतः मैदान तयार केले. क्रीडाशिक्षक दत्तात्रय मंजनर व सहकारी शिक्षकांनी कबड्डी, खो-खो व वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा शालेय वेळेव्यतिरिक्त व सुट्टीच्या दिवशीही सातत्याने सराव घेतला. आवश्यक क्रीडा साहित्य व स्पोर्ट्स ड्रेससाठी लोकसहभाग उभारण्यात रुस्तूम दौंड व जयराम देवढे यांचे योगदान लाभले.

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत कबड्डी मुलींचा छोटा गट, खो-खो मुलींचा छोटा गट तसेच खो-खो मुलांचा छोटा गट हे तिन्ही संघ अजिंक्य ठरून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाले. तसेच ५० मीटर धावण्याच्या स्पर्धेत यशराज बाबासाहेब सोनवणे याने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.

या यशात दत्तात्रय मंजनर, जयराम देवढे, बाळासाहेब गोर्डे या शिक्षकांचे मोलाचे योगदान लाभले. सरपंच राम बामदळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाबासाहेब सोनवणे, उपाध्यक्ष सत्तार शेख व सदस्यांचे सहकार्य मिळाले. मुख्याध्यापिका श्रीमती विजया कवडे यांच्यासह सर्व शिक्षकवृंदाचे कौतुक होत आहे. या यशाबद्दल शिक्षणाधिकारी, अधिकारी, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## टिळकनगर इंडस्ट्रीज परिसरात बिबट्या अडकला



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : टिळकनगर इंडस्ट्रीज परिसरात काल मंगळवारी पहाटे ०४ वाजता कुमावत यांच्या शेतात बिबट्या जेरबंद झाला.या परिसरात गुरुवारी बिबट्याने शेडमध्ये येऊन शेळी खाल्ली होती.त्यानंतर पिंजरा लावण्यात आला होता. त्यात हा बिबट्या अडकला.

वन खात्याचे अक्षय बडे, राहुल कानडे, विलास डगळे आदींनी बिबट्या सुरक्षित ठिकाणी हलवला. प्राणी मित्र बंडू खेमनर यांनी बिबट्या पूर्ण वाढलेला दहा ते बारा वर्षांचा नर असल्याची माहिती यावेळी दिली.

दरम्यान आतापर्यंत श्रीरामपूर तालुक्यात एकूण बारा बिबटे पकडल्याची माहिती वनरक्षक अक्षय बडे यांनी दिली.या परिसरात आणखी २ बिबटे आहेत असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.



## शासकीय जमिनीवरील अतिक्रमण होणार नियमानुकूल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : ग्रामीण भागात शासकीय जमिनींवर निवासी प्रयोजनासाठी झालेले अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने १२ जानेवारी रोजी घेतला आहे. या प्रश्नासाठी टाकळीभान येथील सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे यांनी पाच दिवस अमरण उपोषण केले होते तसेच संभाजीनगर खंडपीठाचे विधिज्ञ ड. अजित काळे यांचे मार्फत जनहीत याचिका दाखल केली होती त्यामुळे शासकिय जागेवरील झालेले अतिक्रमण निमानुकूल करण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागल्याने अखेर बापूसाहेब शिंदे यांच्या लढ्याला यश मिळाल्याचे बोलले जात आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे सरकारी जागांवर निवासी अतिक्रमण वाढल्यामुळे गेल्या काही वर्षां पासून गरजूंना मिळणाऱ्या घरकुलसाठी मालकी हकाची जागा असावी, या अटीमुळे घरकुल मंजुर होवूनही निधी पडून होता. सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे यांनी याप्रश्नी पाच दिवस आमरण उपोषण करुन, ड. अजित काळे यांच्यामार्फत संभाजीनगर खंडपिठामध्ये जनहित याचिका दाखल केली होती. गेल्यावर्षी गरीबांचे घरकुलाचे स्वप्न भंग पावत असल्याचे पाहून बापूसाहेब शिंदे यांनी, घरकुलाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे केली होती. या आवाहनाला तालुक्यातील ५४ व राहूरी तालूक्यातील ३२ ग्रामपंचायतींनी साथ दिली होती. व अतिक्रमणे नियमानुकूल होण्यासाठी ठरावही दिले होते.

बापूसाहेब शिंदे यांनी या प्रमुख मागणी साठी टाकळीभान मंडळ अधिकारी यांचे कार्यालया समोर ५ दिवस आमरण उपोषण केले होते. माजी आमदार लहू कानडे यांनी या उपोषणाला पाठींबा देवून, विधानसभेत हा प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन देवून हे उपोषण सोडले होते. उपोषणानंतर शिंदे यांनी, खंडपिठाचे ज्येष्ठ विधिज्ञ ड. अजित काळे यांच्यामार्फत जनहीत याचिका दाखल केली होती. ग्रामीण भागात सरकारी जमिनींवर निवासी कारणासाठी १ जानेवारी २०२१ पूर्वीची झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.

मात्र, जागेची मोजणी, क्षेत्रमर्यादा, दंड आकारणी आदी तांत्रिक अडचणींमुळे अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. १२ जानेवारीच्या नव्या 'जीआर' नुसार निवासी वापरातील जागेच्या मर्यादेत, तसेच दंड आकारणीच्या नियमांत सवलत देण्यात आली आहे. नव्या शासकीय धोरणामुळे या अडचणी दूर होऊन प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाल्यास घरकुल लाभार्थीना मोठा दिलासा मिळणार आहे.

बापूसाहेब शिंदे यांना जिल्हा बँकेचे संचालक तथा नगराध्यक्ष करण ससाणे, माजी आ. लहू कानडे, ड. अजित काळे,प्रा. कार्लस साठे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे टाकळीभान ग्रामपंचायतच्या सरपंच अर्चनाताई यशवंत रणनवरे, भैरवनाथनगर ग्रामपंचायतचे सरपंच दिपालीताई प्रविन फरगडे, भोकरचे सरपंच शितलताई प्रताप पटारे, माळवाडगावचे उपसरपंच शाम आसने, खंडाळ्याचे सरपंच छाया बर्डे, केसापूरचे सरपंच मेहत्रे, ब्राम्हणगावचे सरपंच शिंदे, अनिल बोडखे, सुरेश पवार व पत्रकार यांचे मोलाचे सहकार्य मिळाले आहे.

## पितळ उघडे पडु नये, म्हणून आमच्या चौकशीचा फार्स

### सभापती सुधीर नवले व भरत साळुंकेचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील बेलापूर बुद्रुक ग्रामपंचायत घरकुल योजनेचे रेखांकन मंजुर न करता बेकायदेशीर बांधकाम केल्याने ग्रा. पं. सदस्य रमेश अमोलिक यांनी पंचायत समितीपुढे आमरण उपोषण केले. त्यांच्या मागणीत तथ्य आढळून आल्याने नेमलेल्या चौकशी समितीपुढे पितळ उघडे पडेल या धास्तीने सत्ताधारी धास्तावले असुन बगल बच्च्यांना हाताशी धरून आमची चौकशी लावण्याचा फार्स रचून मूळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न करून जनतेची दिशाभूल करीत आहे, असा आरोप बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व माजी सरपंच भरत साळुंके यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की,आमच्या खाजगी मालमत्तेची चौकशी करण्याचे सर्वाधिकार वास्तविक ग्रामपंचायतीला आहे. पाच वर्ष आपण सत्तेत असताना झोपा काढत होता का?आम्ही केलेल्या सर्व कामांची परवानगी घेतली आहे. आम्ही कोणत्याही चौकशीला तयार आहोत.सत्य काय ते चौकशीत पुढे येईलच. परंतु बेलापूर बुद्रुक ग्रामपंचायतील सत्ताधारी आणि ती चालवणारे गावपुढारी व विद्यमान पदाधिकारी हे राहत असलेली घरे व व्यवसाय करीत असलेल्या मालमत्ता बेकायदेशीर व अतिक्रमित आहेत. त्याचीही चौकशी करावी अशी मागणीही सभापती सुधीर नवले व माजी सरपंच भरत साळुंके यांनी केले आहे.

## शेतीपंप चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश
## एक अटक, दोन फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या कुंभारवाडी परिसरातून शेतीचे विद्युत पंप (पाणबुडी मोटार) आणि कॉपर केबल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आश्वी पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यापैकी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे, तर दोन आरोपी अद्याप फरार आहेत.

फिर्यादी बाळासाहेब दत्तु उगले (वय ४२, रा. कुंभारवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ही चोरी दि. ३० जानेवारी २०२६ च्या सायंकाळी ७:०० वाजेपासून ते ३१ जानेवारीच्या सकाळी ७:०० वाजेच्या दरम्यान घडली. कुंभारवाडी येथील शेती गट नं. ५१ मधील विहिरीतून चोरट्यांनी संगनमताने विद्युत मोटारी चोरून नेल्या. या चोरीमध्ये एकूण ४२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे. यामध्ये बाळासाहेब उगले यांची १२,००० रुपये किमतीची संजीवनी कंपनीची ५ क्ष ची मोटार , नवनाथ बन्सी उगले यांची १२,००० रुपये किमतीची ५ क्ष ची मोटार , विनोद भीमराज दिवटे यांची १०,००० रुपये किमतीची वेगा कंपनीची ५ क्ष ची मोटार , सुमारे ८,००० रुपये किमतीची २०० फूट लांबीची कॉपर केबल. या प्रकरणी पोलिसांनी वरंवडी येथील विकास बाळासाहेब ढेरगे , राजू सोमनाथ वर्पे , साईनाथ कैलास वर्पे या तीन तरुणावर गुन्हा दाखल केला असून यापैकी एका आरोपीला आश्वी पोलिसांनी अटक केली असून, त्याचे दोन साथीदार सध्या फरार आहेत.

पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १३/२०२६ नुसार दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई आश्वी पोलिस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार लहामगे तपास करत आहे .

## कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या गाईंची सुटका

### ४ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : पोलीस अधीक्षक अहिल्यानगर व अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर यांच्या आदेशानुसार राहुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना संशयास्पद पिकअप वाहनातून जनावरांची अवैध वाहतूक उघडकीस आली आहे. सोमवार दि. ३ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट हे शासकीय वाहनाने रात्रीची गस्त घालत असताना रेल्वे स्टेशन रोडवर तांदूळवाडी (ता. राहुरी) शिवारात एक पिकअप गाडी भरधाव वेगाने जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संशय बळावल्याने त्यांनी वाहनाचा पाठलाग केला. मात्र पाठलागादरम्यान चालकाने पिकअप गाडी रस्त्यावरच थांबवून चालक व त्याच्यासोबत असलेला एक इसम अंधाराचा फायदा घेत वाहन सोडून पळून गेले.

पोलिसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये तीन मोठ्या जर्सी गायी व दोन लहान वासरे अशी पाच जनावरे दाटीवाटीने कोंबलेली आढळून आली. तात्काळ अतिरिक्त पोलीस पथक घटनास्थळी बोलावून पिकअप गाडी राहुरी पोलीस ठाण्यात आणण्यात आली. यामध्ये महिंद्रा कंपनीची पिकअप व पाच गायी असा एकूण ४ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा क्रमांक ११३/२०२६ अन्वये महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा व मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट व त्यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते करीत आहेत.

## साईमंदिरातील चांदी पादुका चोरी तिघे श्रीरामपुरातून ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील श्री साईबाबा मंदिरातील चांदीच्या पादुका चोरीप्रकरणी संगमनेर तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई श्रीरामपूर येथून करण्यात आली असून पोलिसांनी चोरट्यांकडून मुद्देमालही जप्त केला आहे. चंदनापुरी येथील श्री साईबाबा मंदिराच्या गाभाऱ्यातील साईबाबांच्या पालखीतील चांदीच्या पादुका तसेच मंदिराच्या आवारात झोपलेले साक्षीदार संजय गाडेकर यांचा मोबाईल असा मुद्देमाल २९ जानेवारी २०२६ रोजी अज्ञात चोरट्यांनी दरवाजाची कडी उघडून चोरून नेला होता.

याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, सुरुवातीला कोणताही ठोस धागा नसल्याने तपासात अडचणी येत होत्या. पोलीस निरीक्षक प्रविण साळुंखे यांनी या गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र पथक तयार केले. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही तपासणी तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान चोरटे श्रीरामपूर येथील वॉर्ड क्रमांक २, एकता चौक परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत छापा टाकून तीन आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत प्रशांत दीपक मावस (रा. खांडगाव, गणेशवाडी, ता. संगमनेर) याने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला पकडले. त्यानंतर रोहित विठ्ठल साळवे (रा. जोशीवाडी, बिल्लोरी, ता. सिन्नर, जि. नाशिक) व आतुल संजय बटवाल (रा. राजापुर रोड, ढोलेवाडी, ता. संगमनेर) यांना अटक करण्यात आली.

सखोल चौकशीत आरोपींनी चंदनापुरी येथील साईबाबा मंदिरातील चांदीच्या पादुका चोरी केल्याची कबुली दिली. तसेच चंदनापुरी घाटात बंद पडलेल्या वाहनावरील चालक हरिष सोनार (रा. सिन्नर, जि. नाशिक) याला कोयत्याचा धाक दाखवून त्याचा मोबाईल व रोख रक्कम चोरल्याचीही त्यांनी कबुली दिली.

आरोपींकडून ३६० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या पादुका (किंमत अंदाजे ९० हजार रुपये), गुन्ह्यात वापरलेली ७० हजार रुपये किंमतीची मोटारसायकल (एमएच-१२-एलके -९०७६), २० हजार रुपये किंमतीचा मोबाईल व २ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रविण साळुंखे तसेच त्यांच्या पथकाने केली.

## ड्रायव्हरचे हातपाय बांधून गव्हाचे कट्टे लंपास; चार आरोपी जेरबंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील देहरे टोलनाक्याजवळ ड्रायव्हर व क्लिनरचे हातपाय बांधून ट्रकमधील गव्हाचे ९५३ कट्टे लुटणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून, सुमारे ३५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमालासह चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली होती. फिर्यादी जगदीश चतूभुज माळी (वय ५५, रा. लहुजा, ता. सितामऊ, जि. मंदसौर, मध्यप्रदेश) हे टाटा कंपनीच्या ट्रक क्रमांक आर.जे. ०९ जी.ई. ५९५७ मधून मध्यप्रदेशातून गहू भरून सोलापूरकडे जात होते. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास देहरे टोलनाक्याजवळ चार अनोळखी इसमांनी तोंड बांधून ट्रकमध्ये प्रवेश केला. चाकूने जीवे मारण्याची धमकी देत त्यांनी ड्रायव्हर व क्लिनरचे हातपाय बांधून केबिनमध्ये टाकले. त्यानंतर ट्रकमधील सुमारे ९ लाख ६७ हजार रुपये किमतीचे ९५३ गव्हाचे कट्टे दुसऱ्या ट्रकमध्ये भरून आरोपी पसार झाले. फिर्यादी व क्लिनर यांना निवडुंगे (ता. पाथर्डी) शिवारात ट्रकसह सोडून देण्यात आले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेची पथके तपासाला लागली. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीनुसार आरोपी मध्यप्रदेशातील असल्याचे निष्पन्न झाले. पुण्याकडे जाणाऱ्या ट्रकचा पाठलाग करून अरणगाव परिसरात आर.जे. ११ जी.सी. २७०४ क्रमांकाचा ट्रक ताब्यात घेण्यात आला. त्यातून अर्जुनसिंग नारायणसिंग सरदार व सागरसिंग गुरजंदसिंग सरदार (दोघे रा. कोलारस, जि. शिवपुरी, म.प्र.) यांना अटक करण्यात आली. चौकशीत त्यांनी कल्ला शब्बीरा कोहरी व रतीलाम मदनलाल कोहरी यांच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींकडून २६ टन गहू (४७५ गोण्यांमध्ये), चोरीस वापरलेला ट्रक असा एकूण ३५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाणे करत आहेत.

## पाथर्डीत सोनसाखळी चोरांचा उच्छाद

### नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा पोलिस ठाण्यात मोर्चा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : तालुक्यात सोनसाखळी चोरट्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, भरदिवसा महिलांच्या व वृद्धांच्या गळ्यातील दागिने हिसकावण्याच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अवघ्या एका आठवड्यात तालुक्यात चार सोनसाखळी चोरीच्या घटना घडूनही अद्याप एकाही आरोपीला अटक न झाल्याने पोलिसांचा धाक संपल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. वसु जळगाव परिसरात वृद्ध नागरिकाच्या गळ्यातील दागिने हिसकावण्याची घटना, मढी येथे भरदिवसा वृद्ध महिलेची सोनसाखळी लुटणे, तसेच पाथर्डी शहरातील साईनाथ नगर परिसरात महिलेच्या गळ्यातील तब्बल तीन तोळ्यांची सोनसाखळी हिसकावून चोरट्यांचे निर्भय पलायन- या घटनांनी तालुक्यातील कायदा-सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजवले आहे. महिलांनी दागिने घालून घराबाहेर पडणेही धोक्याचे ठरत असल्याचे नागरिक सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्यासह सर्व नगरसेवकांनी थेट पाथर्डी पोलीस ठाण्यात धडक देत पोलिस निरीक्षकांना जाब विचारला. शहरात गुन्हेगार मोकाट फिरत असताना पोलीस नेमके काय करत आहेत? असा थेट सवाल लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला.

यावेळी पोलिसांनी मनुष्यबळाच्या कमतरतेचे कारण दिले; मात्र हे कारण लोकप्रतिनिधींनी फेटाळले. नगराध्यक्ष अभय आव्हाड म्हणाले, नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पोलिस प्रशासनाचीच आहे. मनुष्यबळ नाही हे कारण मान्य नाही. लोकप्रतिनिधींनी बिगर नंबर प्लेट व फॅन्सी नंबर प्लेट लावलेल्या वाहनांवर तातडीने कारवाई, शहरात नियमित गस्त आणि सोनसाखळी चोरट्यांना त्वरित जेरबंद करण्याची मागणी केली. अन्यथा 'पाथर्डी बंद'चा इशाराही देण्यात आला.

## जेवायला बोलवून पती-पत्नीवर जीवघेणा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : उसतोडीच्या उचल रक्कमेच्या वादातून एका दाम्पत्याला जेवणाचे आमंत्रण देऊन त्यांच्यावर कुर्हाड आणि कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना गुणवडी येथे घडली आहे. याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांच्या पतीला आरोपींनी जेवणासाठी बोलावले होते. यावेळी उसतोडीच्या पैशांच्या कारणावरून वाद उफाळून आला. आरोपी पवन युनुस काळे हा कुर्हाड घेऊन, तर केतन युनुस काळे कोयता घेऊन फिर्यादीच्या पतीच्या अंगावर धावून गेले. यावेळी अतुल युनुस काळे याने फिर्यादी आणि त्यांच्या पतीच्या डोळ्यात मिरची पूड फेकून त्यांना असहाय्य केले. त्यानंतर पवन आणि केतन यांनी कुर्हाडीच्या दांडयाने फिर्यादीच्या पतीला बेदम मारहाण केली. यावेळी उपस्थित असलेल्या धुडस्या काळे, सुरज काळे, वैभव भोसले, विजया काळे, आरकी काळे आणि कोहिनूर भोसले यांनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली. 'आम्ही तुझ्या मेहुण्याचे पैसे देणार नाही, तुला काय करायचे ते करून घे, तुला आणि तुझ्या कुटुंबाला बंदुकीने उडवून टाकू' अशी धमकीही आरोपींनी दिली. या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून, पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खरमाळे करत आहेत.

## उसणे पैसे परत मागितल्याचा राग; मित्रानेच ठेचले मित्राचे डोके

### रायमोहातील खुनाचे गूढ उलगडले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड** : उसणे दिलेले पैसे परत मागितल्याच्या रागातून मित्रानेच मित्राची हत्या केल्याची धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील रायमोहा (ता. शिरूर कासार) परिसरात उघडकीस आली असून, स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत खुनाचे गूढ उलगडत आरोपीस बेड्या ठोकल्या आहेत. या जलद कारवाईमुळे पोलीस दलाचे सर्वत्र कौतुक होत आहे. रायमोहा येथील दगडवाडी शिवारात राजुरी-नवगण-चिंचपूर मार्गालगत सोमवारी (दि. २) सकाळी चाँद अल्हाहुद्दीन तांबोळी (वय ३०, रा. रायमोहा) याचा रक्तभंबाळ अवस्थेतील मृतदेह रस्त्यालगतच्या खड्ड्यात आढळून आला होता. व्यवसायाने पेंटर असलेल्या चाँद याच्या हत्येमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती.

चाँद तांबोळी हा रविवारी (दि. १) सकाळी बीड येथे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला होता. सायंकाळी परत येताना त्याने नातेवाईकांना विविध ठिकाणी असल्याचे फोनवर सांगितले. मात्र त्यानंतर त्याचा एक मोबाईल बंद झाला, तर दुसऱ्या फोनवरून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर नातेवाईकांनी शिरूर कासार पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली.

सोमवारी सकाळी महामार्गावरून जाणाऱ्या नागरिकाने दगडवाडी शिवारात मृतदेह पडल्याची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. तपासात चाँदच्या डोक्याच्या मागील बाजूस दगडाने जबर मार केल्याची खोल जखम आढळली. त्याला रस्त्यावर फरफटत खड्ड्यात फेकण्यात आल्याचेही स्पष्ट झाले. पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपासाला लागले. मोबाईल लोकेशन व तांत्रिक तपासाच्या आधारे अतिक गुलाब तांबोळी (रा. इस्लामपुरा पेठ, बीड) यास ताब्यात घेण्यात आले.

कडक चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली देत, चाँदकडून उसणे घेतलेले पैसे परत मागितल्याचा राग मनात धरून त्याची दगडाने हत्या केल्याचे मान्य केले. स्थानिक गुन्हे शाखेच्या या तत्पर कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत असून, पुढील तपास पाटोदा पोलीस करत आहेत.